# महाराष्ट्र वृत्तांत

www.Maharashtravrutant.com
R.N.I. No. MAHMAR/2022/86384

संपादक : अनिकेत विकास पाटील / कार्यकारी संपादक : विकास शिवराम पाटील | किंमत : रु. २ । वर्ष : ३ । अंक : २६८ | बुधवार, १७ सप्टेंबर २०२५ | Email Id : mhvrutant@gmail.com | पाने: ६

Editor: Aniket Vikas Patil / Executive Editor: Vikas Shivram Patil | Price: 2 Volume: 3 | Issue: 268 | Wednesday, 17 September 2025 | Email Id : mhvrutant@gmail.com | Pages: 6


### महाराष्ट्र हवामान

| ठाणे | परभणी |
|---|---|
| 28°C | 26°C |
| **रत्नागिरी** | **अकोला** |
| 27°C | 26°C |
| **सिंधुदूर्ग** | **पुणे** |
| 28°C | 23°C |


### राशिभविष्य/मनोरंजन/क्रीडा

'दसरा' चित्रपटाचे दिग्दर्शक श्रीकांत ओडेला - नानी पुन्हा एकदा करणार... - पेज २

अशोक सराफ यांना संगीतसूर्य केशवराव भोसले पुरस्कार जाहीर, अभिनयाच्या... - पेज २

### महाराष्ट्र

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या राज्यातील सर्व लाभार्थ्यांना... - पेज 3

कोकण विभागात 'सेवा पंधरवडा' चे आयोजन 17 सप्टेंबर ते 02 ऑक्टोबर दरम्यान तीन टप्प्यात विविध उपक्रम राबविणार - पेज 3

### संपादकीय / महाराष्ट्र

सकारात्मक संबंधांचे लक्षण ? - पेज ४

मराठवाडा मुक्ती संग्राम दिन - पेज ४

### समिश्र

डोहोळे ग्रामपंचायतची विविध सोयीसुविधा उपयुक्त घौडदौड! - पेज ५

एमटीडीसीच्या पहिल्या डिजिटल 'ई-ब्रोशर'चे पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांच्या हस्ते लोकार्पण - पेज ५

### समिश्र

जिल्हा परिषदेत अनेक शासकीय अभियानांच्या... - पेज ६

स्वस्थ नारी सशक्त परिवार अभियानात ठाणे महापालिकेची महिला व बालकांसाठी... - पेज ६


### सुविचार

पृथ्वीवरील घनदाट वृक्षांच्या छायेपेक्षा विवेक रूपी वृक्षांची छाया अधिक शीतल असते.

- लालचंद दगडू कंखरे


### वाचकांना विनम्र सूचना

'महाराष्ट्र वृत्तांत' वृत्तपत्रातून प्रसिध्द होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकुराची शहानिशा करुनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची 'महाराष्ट्र वृत्तांत' वृत्तपत्र समूह कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल 'महाराष्ट्र वृत्तांत' वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक जबाबदार राहणार नाहीत, (वातम्या / लेख/ जाहिराती यांची जवाबदारी संबंधित वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यावर राहिलं) न्यायालय प्रक्रिया ठाणे शहर न्यायालयाअंतर्गत याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- कार्यकारी संपादक: श्री. विकास पाटील


# राज्यात पावसाचे थैमान!; मुंबईतील सखल भाग जलमय



**मुंबई (सुचित शिंदे) :** काही काळ विश्रांती घेतलेल्या पावसाने रविवारी पुन्हा एकदा मुंबईसह राज्यात दमदार 'एंट्री' केली. रविवारी रात्रीपासून मनसोक्त बरसणाऱ्या पावसाने मुंबईसह राज्याला अक्षरश: झोडपून काढले. मराठवाड्यात पूरस्थिती निर्माण झाली असून पावसाच्या पाण्यात अडकलेल्या २१३ लोकांना 'एनडीआरएफ' आणि 'एसडीआरएफ'च्या मदतीने सुरक्षित स्थळी हलवण्यात आले आहे. अहिल्यानगर जिल्ह्याच्या पूर्व भागात आणि बीड जिल्ह्याच्या पश्चिम भागात रविवारी रात्री झालेल्या ढगफुटीसदृश पावसामुळे पूरस्थिती गंभीर झाली आहे.

मुसळधार पावसामुळे मुंबईतील सखल भाग जलमय झाले, तर रस्ते व रेल्वे वाहतुकीचा वेग मंदावला होता. मुसळधार पावसाचा फटका सोमवारी उपनगरीय लोकल सेवेला बसला. मध्य आणि पश्चिम रेल्वेवरील लोकल सेवा विलंबाने धावत होती. मध्य रेल्वेच्या दादर रेल्वे स्थानकादरम्यान आणि पश्चिम रेल्वेवरील वांद्रे स्थानकात रेल्वे रुळांवर पाणी साचल्याने लोकलचा वेग मंदावला. त्यामुळे सकाळी गर्दीच्या वेळी प्रवाशांना त्रास सहन करावा लागला. तसेच पुढील दोन दिवस मुंबईत 'यलो', तर रायगडमध्ये 'ऑरेंज' अलर्ट जारी करण्यात आले आहे.

दादर, कुर्ला, शीव, घाटकोपर, विक्रोळी, कांजूरमार्ग, वांद्रे, अंधेरी, बोरिवली भागात मुसळधार पाऊस पडल्याने रेल्वे मार्गावरील दृश्यमानता कमी झाली. त्यामुळे लोकलचा वेग कमी करण्यात आला होता. दोन्ही मार्गांवरील लोकल २५ ते ३० मिनिटे उशिराने धावत होत्या. रविवार मध्यरात्रीपासून मुंबई आणि उपनगरांत पावसाने जोरदार हजेरी लावल्यामुळे सखल भागात पाणी साचले. सायन, माटुंगा, दादर, चेंबूर, कुर्ला, वडाळा, दादर, परळ आदी भागातील रस्ते पाण्याखाली गेल्याने वाहतुकीवर परिणाम झाला. कुर्ला, सायन, माटुंगा येथील रेल्वे रूळावर पाणी आल्याने रेल्वे विलंबाने धावत होती. मोनोरेलही बंद पडल्याने प्रवासी काही वेळ अडकून पडले. मुसळधार पावसामुळे आठवड्याच्या पहिल्याच दिवशी वाहतूक कोलमडल्याने मुंबईकरांचे हाल झाले.

कसारा, टिटवाळा, कर्जत, बदलापूर, कल्याण, ठाणे, पनवेल, वाशी येथून सीएसएमटीच्या दिशेने जाणाऱ्या अनेक लोकल नियोजित वेळेच्या १५ ते २० मिनिटे उशिराने धावत होत्या. तसेच डहाणू रोड, विरार, बोरिवली, अंधेरी येथून चर्चगेटच्या दिशेने जाणाऱ्या अनेक लोकल नियोजित वेळेच्या १० ते १५ मिनिटे उशिराने धावत होत्या. परिणामी, महत्त्वाच्या स्थानकात प्रवाशांची प्रचंड गर्दी झाली होती.

राज्यात रविवार रात्रीपासून जोरदार पाऊस कोसळत आहे. सोमवारी सकाळी पावसाचा जोर कायम होता. सकाळपासूनच सुरू राहिलेल्या पावसाने मुंबईसह उपनगर, ठाणे, पुणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, बीड आदी जिल्ह्यात जोरदार बॅटिंग केली. मुंबईत सर्वाधिक १३४.४ मिमी, सांताक्रुझ ७३.२ मिमी, पुणे ५४.४ मिमी, रायगड ५१.९ मिमी., बीडमध्ये ३७.२ मिमी. पावसाची नोंद झाली.

बीड जिल्ह्यात पूरस्थिती गंभीर बनली असून कडा नदीला आलेल्या पुरामुळे अनेक गावात पाणी शिरले असून, ग्रामस्थ जीव वाचवण्यासाठी इमारतींच्या छतावर चढले होते आणि मदतीची याचना करत होते. पुरात अडकलेल्या नागरिकांच्या बचावासाठी अखेर लष्कराला पाचारण करण्यात आले. लष्कराच्या जवानांनी हेलिकॉप्टरच्या मदतीने अडकलेल्या लोकांना बाहेर काढले. पुरामुळे जनावरे आणि शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.

मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिवसभरातील सगळ्या बैठका रद्द करून मंत्रालयातील आपत्कालीन कक्षाला भेट दिली व आपत्कालीन कक्षाचे संचालक डॉ. भालचंद्र चव्हाण यांच्याकडून पावसाच्या स्थितीचा आढावा घेतला.

दरम्यान मुंबई, पुणे, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील अधिकाऱ्यांशी शिंदे यांनी संपर्क साधून पूरस्थितीत अडकलेल्या नागरिकांचे सुरक्षितस्थळी स्थलांतर केले. तसेच आवश्यक त्या उपाययोजना तातडीने करण्याचे आदेश दिले.

### पुढील तीन दिवस मुसळधार पावसाचे

पुढील तीन दिवस राज्याला पाऊस झोडपून काढणार असल्याचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. मंगळवारी रायगड, छत्रपती संभाजीनगर आणि पुणे घाटमाथ्यावर पावसाचा 'ऑरेंज' अलर्ट देण्यात आला आहे. कोकणपट्टीत दमदार पावसाची शक्यता असून मराठवाड्यालाही यलो अलर्ट देण्यात आला आहे. बुधवारी आणि गुरुवारी संपूर्ण उत्तर महाराष्ट्र व सिंधुदुर्ग वगळता कोकणपट्टीवर तसेच पुणे, सोलापूर, अहिल्यानगर, नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगावला पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. सातारा, सांगली, कोल्हापूर जिल्ह्यात हलक्या पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

### पवईत दरड कोसळली

शिव भगतानी मनोर को. ऑप. हाऊसिंग सोसायटी, पंचसृष्टी कॉम्प्लेक्स पवई येथे असलेल्या टेकडीवरून दोन दगड मातीसह खाली असणाऱ्या तीन-चारचाकी वाहनांवर पडले. म्हाडाने येथील धोकादायक दगड मातीचा ढिगारा हटवण्याचे काम सुरू केले आहे. दरम्यान, या घटनेत कोणीही जखमी झाले नाही.

### बसमार्ग वळवले

खार स्वामी विवेकानंद मार्गावर नॅशनल कॉलेज येथे पावसाचे पाणी भरल्याने वांद्रे तलाव आणि खार पोलीस स्टेशन दरम्यान बसमार्ग ए-१, ४-मर्यादित, सी-३३, ८३, ए-८४, ए-२०२, २५५ मर्यादित, ए-४७३ या क्रमांकाच्या बसेस सकाळी ७ वाजल्यापासून लिंकिंग रोड मार्गाने वळविण्यात आल्या.

## श्री तुळजाभवानी देवी शारदीय नवरात्र महोत्सवाला महाराष्ट्राच्या प्रमुख महोत्सवाचा दर्जा – पर्यटन मंत्री शंभूराज देसाई

### महोत्सवात स्थानिक लोकपरंपरांचे होणार सादरीकरण

**मुंबई :** श्री तुळजाभवानी देवी शारदीय नवरात्र महोत्सवाला राज्यातील प्रमुख महोत्सवाचा प्रतिष्ठित दर्जा प्रदान केला असून हा भव्य महोत्सव २२ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर, २०२५ या कालावधीत, घटस्थापनेपासून विजयादशमीपर्यंत, धाराशिव (उस्मानाबाद) जिल्ह्यातील तुळजापूर येथे साजरा होईल. या महोत्सवादरम्यान स्थानिक लोककला, गोंधळी गीत, भारुड, जाखडी नृत्य यांसारख्या पारंपरिक कलांचे सादरीकरण होईल. गोंधळ, भजन आणि कीर्तन यांसारख्या धार्मिक-सांस्कृतिक स्पर्धा आयोजित केल्या जातील, अशी माहिती पर्यटनमंत्री शंभूराज देसाई यांनी दिली.


मंत्री श्री.देसाई म्हणाले की, महाराष्ट्रातील साडेतीन शक्तीपीठांपैकी एक असलेल्या श्री तुळजाभवानी माता अंबाबाईच्या प्राचीन मंदिरासाठी तुळजापूर हे पवित्र तीर्थक्षेत्र देशभर प्रसिद्ध आहे. या दहा दिवसीय महोत्सवात महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगणा आणि देशाच्या विविध भागांतून सुमारे ५० लाख भाविक श्री तुळजाभवानीच्या दर्शनासाठी तुळजापुरात दाखल होतात. या कालावधीत तुळजापूर शहर धार्मिक उत्साह, सांस्कृतिक वैभव आणि सामाजिक एकतेच्या रंगांनी उजळून निघते. या महोत्सवा दरम्यान स्थानिक लोककलांसह राष्ट्रीय आणि प्रादेशिक स्तरावरील ख्यातनाम कलाकारांचे सांस्कृतिक कार्यक्रम या उत्सवाला विशेष रंगत आणतील.

MAHARASHTRA TOURISM

पान ४ वर

## 'जेम्स अँड ज्वेलरी' क्षेत्रातील कुशल मनुष्यबळासाठी अभ्यासक्रम सुरू करणार – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई :** 'जेम्स अँड ज्वेलरी' क्षेत्रात रोजगाराच्या अनेक संधी आहेत. या क्षेत्रात विश्व स्तरावर नेतृत्व करण्याची भारताकडे क्षमता आहे. यासाठी राज्य शासन कौशल्य (स्किल) विद्यापीठ अंतर्गत 'जेम्स अँड ज्वेलरी' क्षेत्रात कुशल मनुष्यबळ तयार करण्यासाठी प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू करेल. ज्यामुळे निश्चितच या क्षेत्राच्या प्रगतीत सातत्य कायम राहील, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जिओ वर्ल्ड कन्वेक्शन सेंटर येथे आयोजित जेम्स अँड ज्वेलरी प्रदर्शनाच्या उद्घाटन प्रसंगी व्यक्त केला.



जेम्स अँड ज्वेलरी प्रदर्शनाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रदर्शनाच्या विविध दालनांनाही मुख्यमंत्र्यांनी भेट दिली. कार्यक्रमप्रसंगी व्यासपीठावर गृह (ग्रामीण) राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, आमदार चित्रा वाघ, जेम्स अँड ज्वेलरी असोसिएशनचे राष्ट्रीय अध्यक्ष राजेश रोकडे, उपाध्यक्ष अविनाश गुप्ता आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, नवी मुंबईतील महापे येथे देशातील अत्याधुनिक 'जेम्स अँड ज्वेलरी' पार्क उभारण्यात येत आहे. या पार्कच्या माध्यमातून 'जेम्स अँड ज्वेलरी' क्षेत्रातील व्यावसायिकांना, निर्यातदारांना सुविधा देऊन अधिकाधिक निर्यात वाढविण्यासाठी शासन काम करेल. तसेच हे क्षेत्र रोजगाराभिमुख बनविण्यासाठी 'जेम्स अँड ज्वेलरी' संघटनेसोबत सहकार्याची शासनाची भूमिका आहे. भारतीय आभूषणे, दागिन्यांना मोठा इतिहास आहे. जगात बऱ्याच देशांमध्ये भारतीय दागिने निर्यात होतात. जागतिक स्तरावर या क्षेत्रात भारत आघाडीवर असून ही आघाडी टिकविण्यासाठी शासनाची धोरणे त्या पद्धतीने सुसंगत करण्यात येतील.

पान ४ वर

## मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत महाजनको – 'एनएमआरडीए'मध्ये सामंजस्य करार

### नागपूर महानगर क्षेत्रातील कोराडी परिसरात पर्यावरण पर्यटन प्रकल्प

**मुंबई :** नागपूर महानगर क्षेत्रातील कोराडी (ता.कामठी) या ठिकाणी पर्यावरणीय पर्यटन स्थळ (ईको टुरिझम) विकसित करण्यासाठी नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एनएमआरडीए) आणि महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लिमिटेड (महाजनको) यांच्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत सामंजस्य करार करण्यात आला. या करारानुसार पर्यटनस्थळ विकसित करण्यासाठी महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लिमिटेड या कंपनीची २३२.६४ हे. आर. जागा नागपूर प्रदेश विकास प्राधिकरणाला ३० वर्षांच्या भाडे करारावर प्रतिवर्ष १/- रूपये भाडेपट्टयावर हस्तांतरीत करण्यात येणार आहे.



यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, नगरविकास

पान ४ वर

## 'राष्ट्रीय पोषण माह'च्या माध्यमातून महिला व बालकांच्या आरोग्यासंदर्भात जनजागृती – आदिती तटकरे

### 'आठव्या राष्ट्रीय पोषण माह'चे १७ सप्टेंबर रोजी उद्घाटन

**मुंबई :** महिला व बालकांच्या आरोग्य व पोषणविषयक स्थितीमध्ये सुधारणा आणि जनजागृतीसाठी २०१८ पासून 'पोषण माह' अभियान राबविण्यात येते. राज्यातील सर्व अंगणवाडीमध्ये १७ सप्टेंबर ते १६ ऑक्टोबर या कालावधीत ८ वा राष्ट्रीय पोषण महिना साजरा करण्यात येणार असून, या अभियानाचे उद्घाटन महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते होणार आहे. या समारंभांचे आयोजन १७ सप्टेंबर रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे दुपारी १.०० वाजता आयोजित करण्यात आले आहे.



आठव्या 'राष्ट्रीय पोषण माह'साठी यंदा केंद्र शासनाने "लठ्ठपणा कमी करणे, बालपणाची काळजी व शिक्षण (ECCE) / पोषणही शिक्षणही, अर्भक व बालक आहार पद्धती (IYCF), पुरुष सहभाग, व्होकल फॉर लोकल व स्वावलंबन, एकत्रित कृती व डिजिटायझेशन" या सहा प्रमुख थीम निश्चित केल्या आहेत. बाळाचे पहिले सुवर्णमयी १००० दिवस या पुस्तिकेचे प्रकाशन तसेच नवनियुक्त अंगणवाडी सेविका-मदतनीस यांना महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते नियुक्तिपत्र प्रदान करण्यात येणार आहे.

कार्यक्रम यशस्वीपणे राबविण्याकरिता सार्वजनिक आरोग्य, शिक्षण, पाणीपुरवठा व स्वच्छता, ग्रामविकास, नगरविकास, आदिवासी विकास व इतर विभागांच्या समन्वयाने व अभिसरणाच्या

पान ४ वर

# 'दसरा' चित्रपटाचे दिग्दर्शक श्रीकांत ओडेला - नानी पुन्हा एकदा करणार धमाल, 'द पॅराडाईज' चित्रपटाचं शूटिंग सुरू

नॅचरल स्टार नानीच्या 'द पॅराडाईज' या चित्रपटाचा फर्स्ट लूक प्रदर्शित झाल्यापासून त्याची चर्चा शिगेला पोहोचली आहे. 'दसरा'च्या प्रचंड यशानंतर, प्रतिभावान दिग्दर्शक श्रीकांत ओडेला या चित्रपटाचे दिग्दर्शन करत आहेत आणि म्हणूनच हा प्रोजेक्ट लवकरच भारतातील सर्वात प्रतीक्षित चित्रपटांपैकी एक बनला आहे. या चित्रपटासह, 'दसरा'नंतर पुन्हा एकदा हातमिळवणी करणाऱ्या नॅचरल स्टार नानी आणि श्रीकांत ओडेला यांच्या सहकार्याकडून प्रेक्षकांना मोठ्या अपेक्षा आहेत. दरम्यान, दिग्दर्शकानं अखेर चित्रपटाच्या वेळापत्रकाची घोषणा केली आहे.

**'द पॅराडाईज'चं शूटिंग सुरू :** श्रीकांत ओडेलाच्या 'द पॅराडाईज'चं शूटिंग सुरू झालंय. दिग्दर्शकानं सोशल मीडियावर एका पोस्टद्वारे त्याचे मागील ब्लॉकबस्टर 'दसरा' आणि पुढचा चित्रपट 'द पॅराडाईजशी यांना कनेक्ट केलं आहे. खरंतर, ओडेलानं आपल्या हाताचा एक फोटो शेअर केला आहे, ज्यामध्ये दोन्ही चित्रपटांचे रिस्टबँड असल्याचे दिसत आहेत. कला विभागानं, नृत्यदिग्दर्शक आणि दिग्दर्शन





टीमसह, 'द पॅराडाईज'साठी एक अनोखा सेट तयार करण्यासाठी कठोर परिश्रम केले आहेत. या चित्रपटासाठी सर्वात मोठे आव्हान म्हणजे झोपडपट्ट्यांना एक मोठे साम्राज्य दाखवणे. तसेच, झोपडपट्ट्या पुन्हा तयार करणे खूप कठीण आहे, कारण त्या वास्तविक जीवनात स्वतःहून विकसित होतात, यामध्ये प्रत्येक लहान जागा वापरली जाते.

**चित्रपटाचा सेट भव्य :** या चित्रपटाचा सेट अशा प्रकारे डिझाइन करावा लागला की, अनेक लहान जागा एकत्र करून एक पक्का सेट तयार करता येईल. या चित्रपटाची कहाणी दाखवण्यासाठी काही विशेष गोष्टी आवश्यक होत्या, या चित्रपटाचा सेट तयार करण्यासाठी टीमनं खूप मेहनत घेतली आहे. 'द पॅराडाईज' हा चित्रपट खूप धमाकेदार असणार आहे. या चित्रपटाच्या सेटवर छोट्या छोट्या गोष्टीकडे लक्ष देण्यात आले आहेत.'द पॅराडाईज' चित्रपटामधील गाण्याला अनिरुद्ध रविचंदर यांनी संगीतबद्ध केलंय. 'द पॅराडाईज'ची निर्मिती सुधाकर चेरुकुरी यांच्या नेतृत्वाखालील एसएलव्ही सिनेमाजनं केली आहे. हे तेच प्रोडक्शन हाऊस आहे ज्यानं 'दसरा' हा सुपरहिट चित्रपट बनवला होता. एसएलव्ही सिनेमाजच्या पाठिंब्यानं, 'द पॅराडाईज'चं दिग्दर्शन श्रीकांत ओडेला यांनी केलंय.

हा चित्रपट २६ मार्च २०२६ रोजी पडद्यावर हिंदी, तेलगू, तमिळ, इंग्रजी, स्पॅनिश, बंगाली, कन्नड आणि मल्याळम या आठ भाषांमध्ये प्रदर्शित होईल.

## सुधीर बाबू आणि सोनाक्षी सिन्हा अभिनीत 'जटाधारा'चं मोशन पोस्टरसह रिलीज डेट आली समोर...

**मुंबई :** सुधीर बाबू आणि सोनाक्षी सिन्हा स्टारर भव्य आणि थरारक चित्रपट 'जटाधारा' हा काही दिवसात प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहे. हा चित्रपट ७ नोव्हेंबर २०२५ रोजी हिंदीसह तेलुगू भाषेत रुपेरी पडद्यावर रिलीज होणार आहे. आता अनेकजण सोनाक्षी सिन्हाला तिच्या नवीन अवतारामध्ये पाहण्यासाठी उत्सुक आहेत. दरम्यान झी स्टुडिओज आणि प्रेरणा अरोरा यांनी चित्रपटाचे कॅरेक्टर पोस्टर आणि धमाकेदार टीझर रिलीज केल्यानंतर पुन्हा एकदा या चित्रपटाबद्दल सोशल मीडियावर चर्चा सुरू झाली होती. आज १५ सप्टेंबर रोजी 'या चित्रपटाच्या निर्मात्यांनी मोशन पोस्टर रिलीज करून प्रेक्षकांचा उत्साह वाढवला आहे.

**'जटाधारा'चं मोशन पोस्टरसह रिलीज डेट जाहीर :** या मोशल पोस्टरमध्ये दैवी मंत्रांच्या प्रतिध्वनीसह एक ब्रह्मांडीय दृश्य सादर केलं गेलं आहे. या चित्रपटामध्ये सोनाक्षी सिन्हासह दिव्या खोसला, इंदिरा कृष्णा, शिल्पा शिरोडकर, रवी प्रकाश, नवीन नेन्नी, रोहित पाठक, झांसी, राजीव कंकला, शुभलेखा सुब्बाकर आणि इतर कलाकार दिसणार आहेत. या चित्रपटात पाप, पुन्य, प्रकाश, अंधार , मानवी इच्छाशक्ती, ब्रह्मांडीय नियती आणि एक भव्य टकराव प्रेक्षकांना पाहायला मिळेल. दरम्यान या चित्रपटाबद्दल




झी स्टुडिओचे सीईओ उमेश कुमार बन्सल यांनी सांगितलं की,'आम्ही ज्या पद्धतीनं 'जटाधारा' जगासमोर आणण्याचा प्रयत्न करत आहोत, त्याचा आम्हाला अभिमान आहे, माझ्यावर विश्वास ठेवा हा केवळ एक चित्रपट नाही तर एक अनुभव आहे, जो स्केल कथा आणि दृष्टी एका नवीन स्तरावर घेऊन जाईल, आम्हाला खात्री आहे की, आमचे भागीदार एसकेजी एंटरप्रायझेस, सुदीप बाबू, सोनाक्षी सिन्हा आणि संपूर्ण टीम प्रेक्षकांना अशा जगात घेऊन जातील जे त्यांनी यापूर्वी कधीही पाहिले नसेल.

**'जटाधारा' चित्रपटाबद्दल :** प्रस्तुतकर्ता आणि निर्माती प्रेरणा अरोरा यांनी चित्रपटाबद्दल म्हटलं "'रुस्तम'च्या यशानंतर, मला झी स्टुडिओजबरोबर आणखी एक मोठी भागीदारी अनुभवायला मिळत आहे, हा माझ्यासाठी अभिमान आणि कृतज्ञतेचा क्षण आहे. हा चित्रपट एक खोलवर जोडलेली कथा आहे, जी आपल्या सांस्कृतिक मुळांना जागतिक चित्रपटविषयक दृष्टिकोनाशी जोडते. आमच्या टीमबरोबर, आम्ही प्रेक्षकांना एक अनोखा अनुभव देणार आहोत, जो भावनिकदृष्ट्या प्रभावी आणि दृश्यदृष्ट्या अविस्मरणीय असेल."

दरम्यान दिग्दर्शक अभिषेक जयस्वाल आणि वेंकट कल्याण यांनी असं सांगितलं की, "'जटाधारा' ही एका लोककथेवर आधारित आहे, जिथे अंधार दैवी शक्तीशी संघर्ष करतो, ज्यामुळं प्रेक्षकांना देवाची उपस्थिती जाणवते. ही श्रद्धा, भीती आणि ब्रह्मांडीय नियतीची कथा आहे." झी स्टुडिओज आणि प्रेरणा अरोरा यांनी सादर केलेला 'जटाधारा' हा चित्रपट उमेश कुमार बन्सल, शिविन नारंग, अरुणा अग्रवाल, शिल्पा सिंघल, प्रेरणा अरोरा, आणि निखिल नंदा यांनी तयार केला आहे. सह-निर्माते अक्षय केजरीवाल आणि कुसुम अरोरा आहेत. क्रिएटिव्ह निर्मात्या दिव्या विजय आहेत आणि पर्यवेक्षी निर्माती भाविनी गोस्वामी आहेत. चित्रपटाचा शक्तिशाली साउंडस्केप झी म्युझिक कंपनीनं सादर केला आहे.

## अशोक सराफ यांना संगीतसूर्य केशवराव भोसले पुरस्कार जाहीर, अभिनयाच्या बादशहाच्या शिरपेचात मानाचा आणखी एक तुरा



अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या कोल्हापूर शाखेच्या वतीने देण्यात येणारा संगीतसूर्य केशवराव भोसले स्मृती पुरस्कार मराठी, हिंदी, चित्रपटसृष्टीसह मराठी रंगभूमी गाजवणाऱ्या अशोक सराफ यांना जाहीर झाला आहे. नाट्य परिषदेच्या कोल्हापूर शाखेचे अध्यक्ष मिलिंद अष्टेकर यांनी पत्रकार परिषदेत घोषणा केली.

**४ ऑक्टोबर रोजी पुरस्काराचं वितरण**

४ ऑक्टोबरला संध्याकाळी पाच वाजता गायन समाज देवल क्लबच्या गोविंदराव टेंबे सभागृहात हा पुरस्कार सोहळा पार पडणार आहे. शाल, श्रीफळ, मानपत्र आणि ५१ हजार रुपये रोख असं पुरस्कारचं स्वरुप आहे. अशोक सराफ आणि त्यांच्या पत्नी निवेदिता सराफ हे दोघंही या पुरस्कार सोहळयाला उपस्थित राहणार आहेत. नाट्य परिषदेच्या वतीने केशवराव भोसले यांच्या जयंतीच्या औचित्याने पुरस्काराचं आयोजन केलं जातं. पुरस्कार सोहळयानंतर निवेदक विघ्नेश जोशी हे अशोक सराफ आणि निवेदिता सराफ यांची प्रकट मुलाखत घेणार आहेत.

**पांडू हवालदार मधून अशोक सराफ आले आणि..**

अशोक सराफ हे १९७० च्या दशकापासून मराठी रंगभूमी, चित्रपट आणि त्यानंतर मालिका विश्वातही कार्यरत आहेत. त्यांनी आजवर मराठी, हिंदी चित्रपटांमध्येही काम केलं आहे. अशोक सराफ यांना महाराष्ट्र भूषण आणि पद्मश्री पुरस्कारांनीही सन्मानित करण्यात आलं आहे. मूळचे बेळगावचे असणाऱ्या अशोक सराफ यांचा जन्म मुंबईत झाला.दक्षिण मुंबईतील चिखलवाडी या भागात त्यांचे बालपण गेलं. गोपीनाथ सावकार हे त्यांचे मामा होत. अशोक सराफ यांचे शिक्षण मुंबईतील डी.जी.टी. विद्यालयात झाले. त्यांना सुरुवातीपासूनच नाटकांची अतिशय आवड होती. वयाच्या अठराव्या वर्षी त्यांनी शिरवाडकरांच्या ' ययाती आणि देवयानी ' या नाटकातील विदूषकाच्या भूमिकेद्वारा व्यावसायिक रंगभूमीवर पाऊल ठेवलं. काही संगीत नाटकांतूनदेखील त्यांनी भूमिका केल्या. त्यांची आजवरची लक्षात राहिलेली 'माईलस्टोन' भूमिका म्हणजे अशीही बनवा बनवी या सिनेमातली धनंजय मानेची भूमिका आहे. तसंच 'पांडू हवालदार' या सिनेमात त्यांनी दादा कोंडकेंसह अभिनय केला. तसंच 'राम राम गंगाराम' या दोन चित्रपटांमध्ये दादा कोंडके यांच्यासह त्यांनी भूमिका केल्या. त्या दोन सिनेमांमधला अभिनयही लोकांच्या लक्षात आहे

**लक्ष्मीकांत बेर्डे आणि अशोक सराफ यांची जोडी हिट**

लक्ष्मीकांत बेर्डे आणि अशोक सराफ यांनी मराठी सिनेसृष्टीचा एक काळ गाजवला आहे. तसंच सचिन, अशोक सराफ आणि लक्ष्मीकांत बेर्डे यांचा अशी ही बनवा बनवी हा चित्रपट आजही लोकांना तेवढाच खळखळून हसवतो यात शंका नाही. धमाल बाबल्या गणप्याची, अफलातून, एका पेक्षा एक, धरलं तर चावतंय, चंगू-मंगू असे एकाहून एक सरस चित्रपट अशोक सराफ आणि लक्ष्मीकांत बेर्डे या जोडीने महाराष्ट्राला हसवलं आहे. अजय देवगणच्या सिंघममधला निवृत्तीकडे झुकलेला अशोक सराफ यांनी साकारलेला हवालदारही लोकांच्या लक्षात आहे. उत्तम टायमिंग, मर्म विनोदातून लोकांना हसवणं आणि वेळेला डोळ्यांतून पाणी काढण्याचीही कला अशोक सराफ यांच्या अभिनयात आहे.

कळत नकळत सिनेमात त्यांनी साकारलेला छोटू मामा त्यांच्या अभिनयाचा हळवा कोपरा दाखवून जातो. बहुरुपी सिनेमातली त्यांची भूमिका मनावर एक आघात करुन जाते. वजीर चित्रपटातला बाबासाहेब मोरे हा मुख्यमंत्री बेरकी राजकारणी कसा असावा ते दाखवून जातो. त्यामुळे अशोक सराफ यांचं नाव घेतल्याशिवाय मराठी सिनेसृष्टी अपूर्ण आहे यात शंकाच नाही.

## दुर्गा देवीची ९ रुपं आणि त्यामागील रहस्य

दरवर्षी शारदीय नवरात्रीची स्थापना अश्विन महिन्याच्या शुल्क पक्षाच्या प्रतिपदेला केली जाते. नऊ दिवस देवीच्या नऊ विविध रुपांची पूजा केली जाते. भाविक मनोभावे देवीची पूजा करत उपवास करतात. यंदा येत्या २२ सप्टेंबरपासून नवरात्रीची सुरुवात होणार आहे. जाणून घेऊयात देवीच्या नऊ रुपे आणि त्यामागील रहस्य

**१. शैलपुत्री –**

पार्वती देवी शैलपुत्री म्हणून ओळखली जाते. पहिल्या दिवशी मातेच्या या रुपाची पूजा केली जाते. माता शैलपुत्री हे दुर्गाचे पहिले रुप मानले जाते. शैल अर्थात पर्वत. पर्वतांचा राजा हिमालयच्या घरी मुलगी म्हणून जन्माला आल्यामुळे तिला शैलपुत्री म्हटले गेले.

**२. ब्रम्हचारिणी –**

नवरात्रीच्या दुसऱ्या दिवशी ब्रम्हचारिणीची पूजा केली जाते. ब्रम्हचारिणी हे दुर्गेचे दुसरे रुप मानले जाते.



ब्रम्हा म्हणजे तपश्चर्या, कठोर तप करणारी देवी म्हणून देवीला ब्रम्हचारिणी हे नाव पडले आहे. महादेवांना प्राप्त करण्यासाठी देवीने कठोर तप केला होता.

**३. चंद्रघंटा –**

नवरात्रीच्या तिसऱ्या दिवशी दुर्गेचे तिसरे रुप चंद्रघंटेची पूजा केली जाते. अर्धचंद्राच्या आकाराचे टिळा देवीच्या मस्तकावर विराजमान आहे, त्यामुळे तिला चंद्रघंटा असे नाव पडले आहे.

**४. कुष्मांडा –**

नवरात्रीच्या चौथ्या दिवशी देवीच्या कुष्मांडा रुपाची पूजा केली जाते. या रुपात देवीने अंडकोषातून सृष्टीची निर्मिती केली, म्हणून तिला कूष्मांडा असे नाव पडले.

**५. स्कंदमाता –**

नवरात्रीच्या पाचव्या दिवशी दुर्गेचे पाचवे रुप स्कंदमातेची पूजा केली जाते. या रुपात देवीने कार्तिकेय यांना मांडीवर घेऊन त्यांना मोठे केले, त्यामुळे तिला स्कंदमाता म्हणतात.

**६. कात्यायिनी –**

नवरात्रीच्या सहाव्या दिवशी कात्यायनी देवीची पूजा केली जाते. जेव्हा महिषासूराचा अत्याचार पृथ्वीवर वाढत होता. तेव्हा भगवान ब्रम्हा, विष्णू आणि महेश यांनी आपल्यातील तेजाच्या अंशाने महिषासुराचा नाश करण्यासाठी देवीची निर्मिती केली. या देवीची पूजा सर्वप्रथम महर्षी कात्यायन यांनी केली. त्यामुळे तिला कात्यायनी असे नाव पडले.

**७. कालरात्री –**

नवरात्रीच्या सातव्या दिवशी कालरात्रीची पूजा केली जाते. काळ म्हणजे संकट, जिच्यामध्ये प्रत्येक संकटाचे नाश करण्याची शक्ती आहे, त्यामुळे तिला कालरात्री असे म्हटले जाते.

**८. महागौरी –**

नवरात्रीच्या आठव्या दिवशी महागौरीची पूजा केली जाते. जेव्हा देवीने भगवान शिवाला प्राप्त करण्यासाठी कठीण तपश्चर्या केली होती की तेव्हा ती काळी पडली होती. महादेव तिच्या तपश्चर्येवर प्रसन्न झाले आणि तिला पत्नी म्हणून स्वीकारले. तेव्हा भोलेनाथने तिचे शरीर गंगाजलच्या पवित्र पाण्याने धुतले. यानंतर, देवीचे शरीर विद्युत प्रकाशासारखे खूप तेजस्वी झाले होते. तिचे हे रुप महागौरी म्हणून ओळखले जाऊ लागले.

**९. सिद्धीदात्री –**

नवरात्रीच्या नवव्या दिवशी देवीच्या सिद्धीदात्री रुपाची पूजा केली जाते. या देवीचे रुप सर्व भक्तांना सिद्धी देणारे आहे.




**मेष :** निर्णय काहीअंशी चुकतील पण धाडस करा. कुटुंबाची साथ मिळेल. प्रतिष्ठा वाढेल. डावपेच यशस्वी होईल. धंदा मिळेल.

**वृषभ :** रखडलेली कामे पूर्णत्वास येतील. नोकरीत वरिष्ठांना खूश करता येईल. दूरच्या प्रवासाचा बेत ठरवाल. स्पर्धा जिंकाल. धंद्यात वाढ होईल. नोकरी मिळेल.

**मिथुन :** मन अस्थिर होईल. आधार नाही अशी भावना मनाला त्रस्त करेल. जवळचे लोक मदत करतील. नोकरीत सावध रहा. नवीन ओळखी होतील. सहवास फायद्याचा ठरेल.

**कर्क :** महत्त्वाचे काम मार्गी लागेल. केस जिंकाल. घर, जमीन यासंबंधी काम करून घ्या. कुणालाही टोचून बोलू नका.

**सिंह :** तुमच्या इच्छेनुसार कामे होतील असे समजू नका. प्रयत्न चालूच ठेवा. यश मिळेल. अरेरावी नको. वाद कमी करा.

**कन्या :** जिद्द कायम ठेवा. चर्चा यशस्वी होईल. प्रभाव पडेल. वरिष्ठांच्या कामात मदत केल्याने तुमचा फायदा होईल.

**तूळ :** धावपळ वाढेल. अधिक काम कराल. पाहुणे येतील. भावना दाटून येतील. संयम ठेवा. प्रकृती सांभाळा.

**वृश्चिक :** घरातील व्यक्तीसाठी खरेदी कराल. खाण्याची चैन कराल. प्रतिष्ठा वाढेल. स्पर्धा जिंकाल. मित्र मिळतील.

**धनु :** तुमच्याकडून कामाच्या अपेक्षा वाढतील. महत्त्वाची वस्तू सांभाळा. चंगळ होईल. प्रवासाचे योग येतील.

**मकर :** महत्त्वाचा निर्णय घ्या. ठरविलेले काम आजच करा. आळस करू नका. नवीन ओळखी होतील. प्रेमाची माणसे भेटतील. धंद्यात फायदा होणार, काम मिळेल.

**कुंभ :** तुम्ही ठरविलेला कार्यक्रम थोडा बदलावा लागेल. प्रेमाची माणसे तुम्हाला आग्रह करतील. धंद्यात लक्ष द्या.

**मीन :** नोकरीत चांगला बदल करता येईल. गोड बोला. घर, वाहन, खरेदीचा विचार कराल. प्रवासाचा बेत ठरवाल. तुमचा कामाचा उत्साह इतरांना प्रेरणा देणारा ठरेल.

**- भावेश जोशी**

# अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या राज्यातील सर्व लाभार्थ्यांना CSC केंद्रामधून मिळणार माफक दरात सेवा

**पालघर :** अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या लाभार्थ्यांना आता CSC केंद्रामधून (Common Service Centre) महामंडळाच्या योजनांचा लाभ माफक दरात घेता येणार आहे. याबाबतचा सामजस्य करार (MOU) महामंडळाच्या मुख्य कार्यालयामध्ये महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक, विजयसिंह देशमुख व CSC केंद्राचे प्रमुख, वैभव देशपांडे यांच्या उपस्थितीत करण्यात आला आहे.

या करारानुसार, अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे लाभार्थी आता त्यांच्या जवळच्या कोणत्याही CSC केंद्रावर जाऊन महामंडळाच्या योजनांचा लाभ कमी दरात घेऊ शकतील. यामध्ये महामंडळाच्या योजनांसाठी ऑनलाइन अर्ज भरणे, कागदपत्रे अपलोड करणे, योजनेची सद्यस्थिती तपासणे आणि आवश्यक मार्गदर्शन मिळवणे यांसारख्या सुविधांचा समावेश आहे.

CSC केंद्र हे ग्रामीण भागातील नागरिकांसाठी विविध सरकारी आणि खासगी सेवा पुरवण्याचे महत्त्वाचे माध्यम आहे. महामंडळाने CSC केंद्रासमवेत केलेल्या करारामुळे महामंडळाच्या लाभार्थ्यांना योजनेचा लाभ घेण्यासाठी जिल्ह्याच्या ठिकाणी जाण्याची गरज भासणार नाही, त्यामुळे त्यांचा वेळ आणि पैसा वाचेल.

महामंडळाचे अध्यक्ष म्हणाले, "या करारामुळे आमची उद्दिष्ट्ये अधिक प्रभावीपणे पूर्ण होतील. राज्याच्या कानाकोपऱ्यात असलेल्या गरजू आणि पात्र तरुणांपर्यंत महामंडळाच्या योजना पोचणार आहेत. कमी खर्चात आणि त्यांच्या घराजवळच त्यांना आवश्यक सेवा मिळाल्यामुळे त्यांना स्वयंरोजगारासाठी प्रोत्साहित करुन मराठा समाजातील तरुणांना उद्योजक करण्याचे महामंडळाचा उद्देश पूर्णत्वास नेणे सोपे होईल.

राज्यामध्ये CSC चे ७२ हजार पेक्षा जास्त केंद्र कार्यरत असल्याने त्यांच्या माध्यमातून अण्णासाहेब पाटील महामंडळाच्या लाभार्थ्यांना त्यांच्या गावातूनच पात्रता प्रमाणपत्र (LOI) कागदपत्र, बँकेचे कर्ज मजुरी (Bank sanction) बँकेचा हप्ता (bank statement) अपलोड करण्यासाठी प्रत्येकी रु. ७०/- शुल्क आकारण्यात येणार असल्याची माहिती महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक विजयसिंह देशमुख यांनी दिली. या करारामुळे लाभार्थ्यांचा वेळ वाचणार आहे आणि त्यांना जिल्ह्याच्या ठिकाणी जाण्याची गरज लागणार नाही. ग्रामीण भागातील उद्योजकतेला चालना मिळेल." यामुळे सद्यस्थितीत महामंडळाच्या नावाखाली लाभार्थ्यांकडून पैसे उकलणाऱ्या अनधिकृत एजंट लोकांना आळा घालणे शक्य होईल. भविष्यात लाभार्थ्यासाठी महामंडळाचे मोबाईल अँप व चॅट बॉट सारख्या सुविधा देखील उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. या नवीन उपक्रमामुळे महामंडळाच्या योजनांचा लाभ घेण्याची प्रक्रिया अधिक सोपी, पारदर्शक आणि किफायतशीर होईल असे मत महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक यांनी व्यक्त केले.

## SHE BOX PORTAL वर खाजगी आस्थापनांची नोंदणी करने बंधनकारक

**पालघर :** कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम २०१३ ची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी POSH ACT २०१३ मधील कलम ४ अन्वये ज्या कार्यालया मध्ये १० किंवा १० पेक्षा जास्त कर्मचारी असतील अशा सर्व आस्थापना मध्ये अंतर्गत तक्रार समिती स्थापन करणे बंधनकारक आहे. व सदरच्या आस्थापनेतील अंतर्गत तक्रार समितीची नोंदणी SHE BOX PORTAL वर करण्यासाठी केंद्र शासनाने निर्देश दिलेले आहेत.

पालघर जिल्हयातील सर्व खाजगी आस्थापनांनी SHE BOX PORTAL वर नोंदणी करणे बंधनकारक आहे. असे आवाहन विवेक चौधरी, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी तथा सदस्य सचिव, स्थानिक तक्रार निवारण समिती पालघर यांनी केले आहे. SHE BOX PORTAL वर खाजगी आस्थापनेतील तक्रार समिती नोंदविण्याची कार्यपद्धती खालीलप्रमाणे आहे. SHE BOX PORTAL. वर अंतर्गत तक्रार समिती नोंदविण्यासाठी कार्यपद्धती खालील प्रमाणे http://shebox.wed.gov.in या वेबसाईट वर जाऊन होम स्क्रीनवर दाखविल्या प्रमाणे अंतर्गत तक्रार समिती नोंदवा (Private Head Office Ragistration) या टॅब वर Click करून आवश्यक त्या सर्व माहितीचा तपशिल भरून Submit या Tab वर Click करून अंतर्गत तक्रार समितीची माहिती नोंदवता येईल.

## कोकण विभागात 'सेवा पंधरवडा' चे आयोजन 17 सप्टेंबर ते 02 ऑक्टोबर दरम्यान तीन टप्प्यात विविध उपक्रम राबविणार



**नवी मुंबई :** महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम, गतिमान व पारदर्शक होण्याची आवश्यकता विचारात घेऊन, भारताचे मा.पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांचा आगामी जन्मदिन दि. 17 सप्टेंबर 2025 ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती दि.०२ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत राज्यभर 'सेवा पंधरवडा' राबविण्याबाबत शासन स्तरावरून निर्देश देण्यात आलेले आहेत. कोकण विभागात हे अभियान दि. 17 सप्टेंबर 2025 ते दि. 22 सप्टेंबर 2025, दि.23 सप्टेंबर ते दि. 27 सप्टेंबर 2025 व दि. 28 सप्टेंबर ते दि. 02 ऑक्टोबर 2025 या 3 टप्प्यांमध्ये राबविण्यात येणार आहे. पहिल्या टप्प्यात 'पाणंद रस्ते विषयक मोहिम', दुसऱ्या टप्प्यात 'सर्वांसाठी घरे या उपक्रमांतर्गत शासन तरतुदींची अंमलबजावणी व पात्र लाभार्थ्यांना पट्टे वाटप मोहिम' तर तिसऱ्या टप्प्यात 'जिल्हाधिकाऱ्यांनी स्थानिक परिस्थितीचा विचार करून नाविन्यक्रम उपक्रम राबविणे' या कार्यक्रमांचा समावेश आहे. अशी माहिती कोकण विभागीय महसूल आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिली.

कोकण विभागातील ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयात एकूण 7 हजार 241 पाणंद/शिव रस्ते असून गाव नकाशाप्रमाणे सदर रस्त्यांची पहाणी करण्याचे काम तालुका स्तरावरून सुरू आहे. तसेच सर्वांसाठी घरे या उपक्रमांतर्गत प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा 2 मध्ये कोकण विभागात घरांचे एकूण उद्दीष्ट 1 लाख 26 हजार 445 असून त्यापैकी 1 लाख 26 हजार 312 (९९.९०%) घरांना मंजूर दिलेली आहे. त्यापैकी 15 हजार 660 घरकुलांचे काम पुर्ण झाले असून उर्वरीत सर्व 1 लाख 10 हजार 652 घरकुलांचे काम प्रगती पथावर आहे. गायरान जमिनी, सार्वजनिक वापरातील जमिनी व वन क्षेत्र वगळून उर्वरित शासकीय जमिनींवर सन 2011 पुर्वीपासून निवासी प्रयोजनार्थ झालेल्या अतिक्रमणांची यादी निश्चित करण्यात येत आहे. यापुर्वी कोकण विभागात जिवंत सातबारा मोहिमेअंतर्गत मयत खातेदारांच्या वारसांच्या नोंदी संदर्भात एकूण दाखल 44 हजार 165 वारस फेरफारांपैकी 42 हजार 910 वारस फेरफार मंजूर करण्यात आले आहेत. कोकण विभागातील शासकीय व सार्वजनिक प्रयोजनार्थ वापरात असलेल्या जमिनी वगळून उर्वरित आकारीपड जमिनी या महाराष्ट्र जमीन महसूल संहिता 1966 चे सुधारित कलम 220 अंतर्गत पुन्हा मिळणेकामी संबंधित मूळ खातेदार अथवा त्यांचे कायदेशीर वारसांनी जिल्हाधिकारी कार्यालयांकडे अर्ज करणेबाबत कोकण विभागीय आयुक्त यांनी आवाहन केले आहे.

कोकण विभागात पाणंद रस्ते विषयक मोहिमेंतर्गत शिवार फेऱ्यांचे आयोजन करणे, गाव नकाशांवर नोंद असलेल्या व नोंद नसलेल्या रस्त्यांचे वर्गीकरण करणे, शिव/पाणंद रस्त्यांचे सर्वेक्षण करणे, रस्त्यांची मोजणी व सीमांकन करणे तसेच विशिष्ट क्रमांक निश्चित करणे, पाणंद रस्त्यांवरील अतिक्रमण निष्कासनाची कार्यवाही करणे यांसारख्या बाबी राबविण्यात येणार आहेत. तसेच 'सर्वांसाठी घरे' या उपक्रमांतर्गत शासकीय जमिनीवरील रहिवासी प्रयोजनासाठी असलेली अतिक्रमणे नियमानुकूल करणे, पात्र लाभार्थ्यांना जमिनींचे पट्टे वाटप इ. च्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येणार आहे.

## मुंबईत 30 सप्टेंबर रोजी 132 वी डाक अदालत

**तक्रारी पाठविण्यासाठी 19 सप्टेंबर पर्यंत मुदत**



**नवी मुंबई :** पोस्टल सेवेला अधिक सक्षम व जनसामान्यांच्या दैनंदिन आयुष्यातील तक्रारींना न्याय मिळवून देण्यासाठी महाराष्ट्र सर्कलतर्फे 132 वी डाक अदालत आयोजित करण्यात आली आहे. ही अदालत 30 सप्टेंबर 2025 रोजी दुपारी 4.00 वाजता मुख्य पोस्टमास्तर, जनरल, दूसरा मजला मुंबई येथील कार्यालयात भरविण्यात येणार असल्याची माहिती वरिष्ठ पोस्ट ऑफीस अधीक्षक, नवी मुंबई विभग, वाशी यांनी दिली आहे.

पोस्टाची सेवा ही सामाजिक-आर्थिक जीवनाचा एक अभिन्न भाग आहे. देशातील प्रत्येक नागरिकांच्या मनामध्ये अपरोक्षपणे पोस्टाच्या सेवेने एक वेगळ्या प्रकारचे स्थान निर्माण करून प्रभावित केले आहे. पोस्ट खाते लोकांना चांगल्या प्रकारची सेवा देण्याचा व ग्राहकांचे जास्तीत जास्त समाधान करण्याचे प्रयत्न करते. ही सेवा देतांना, संभाषणामध्ये / पत्रव्यवहारामध्ये किंवा सेवेमधील काही त्रुटींमुळे असे काही प्रसंग निर्माण होतात की, त्यामुळे पोस्टाच्या सेवेबद्दल तक्रार करण्याची वेळ येते. ह्या तक्रारींचा योग्य प्रकारे न्याय निवाड़ा करण्यासाठी पोस्ट खात्याने वेळोवेळी डाक अदालत घेण्याचे ठरविले आहे. त्यामध्ये पोस्ट विभागाचे अधिकारी तक्रार सोडविण्याचा प्रयत्न करतात.

डाक अदालत ही ग्राहकांच्या तक्रारींवर तत्काळ आणि न्याय तोडगा काढण्यासाठी प्रभावी व्यासपीठ ठरते. ग्राहकांना टपाल सेवांमध्ये आलेल्या अडचणी, वस्तूंचे नुकसान, न मिळालेल्या मनीऑर्डर/बचत बँक खाते/प्रमाणपत्र इत्यादींसंबंधी तक्रारी या न्यायमंचात मांडता येतात. तसेच मागील सहा महिन्यांपासून प्रलंबित असलेल्या तक्रारींचे निराकरण यामध्ये केले जाते.

महाराष्ट्र आणि गोवा राज्याशी सबंधित पोस्टाच्या सेवे विषयी किंवा कामकाजाबद्दल ज्या तक्रारींचे निवारण सहा आठवड्यांच्या आत झालेले नसेल व समाधानकारक उत्तर मिळाले नसेल अशा तक्रारींची या डाक अदालतीमध्ये दखल घेतली जाईल. विशेषतः टपाल वस्तु, मनी ऑर्डर, बचत बैंक खते, प्रमाणपत्र इत्यादी बाबतच्या तक्रारी विचारात घेतल्या जातील तक्रारीचा उल्लेख सर्व तपशीलासह केलेला असावा उदा. तारीख व ज्या अधिकाऱ्यास मूळ तक्रार पाठवीली असेल त्याचे नाव व हुद्दा इत्यादी.सबंधितांनी डाक सेवे बाबतची आपली तक्रार सहायक निदेशक डाकसेवा (ग्राहक संतुष्टि) आणि सचिव, डाक अदालत, मुख्य पोस्टमास्टर जनरल यांचे कार्यालय, मुंबई जीपीओ बिल्डिंग, जीपीओ कॉम्पलेक्स, पहिला मजला, मुंबई 500 001 यांच्या नावे दोन प्रतीत दिनांक 19 सप्टेंबर 2025 पर्यंत अथवा त्यापूर्वी पाठवावी त्यानंतर आलेल्या तक्रारींची दखल घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी. असे आवाहन वरिष्ठ पोस्ट ऑफीस अधीक्षक, नवी मुंबई विभग, वाशी यांनी एका प्रसिध्दी पत्रकाव्दारे केले आहे.





**ठाणे :** सरकारने नवीन जीएसटी GST स्लॅब जाहीर केल्याने ठाण्यातील लघुउद्योजकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. येत्या २२ सप्टें.पासुन या नविन जीएसटी दरप्रणालीची अंमलबजावणी होणार असल्याच्या पार्श्वभूमीवर मंगळवारी ठाणे लघुउद्योजक संघटनेच्या (टिसा) वतीने आमदार संजय केळकर यांना अभिनंदनाचे पत्र सुपूर्द करण्यात आले. यावेळी टिसाचे एकनाथ सोनवणे आदी उपस्थित होते.सरकारने लघु उद्योग व काही क्षेत्रांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला आहे,पण उद्योग-व्यवसायांवर याचा नेमका परिणाम दिसायला थोडा वेळ लागेल. काहींसाठी हे बदल लाभदायक ठरू शकतात, तर काहींना पुरवठा साखळी व खरेदी प्रक्रिया नव्याने मांडावी लागू शकते. किरकोळ व घाऊक व्यापाऱ्यांच्या दृष्टीने, नफा मार्जिन, किंमत धोरण आणि ग्राहकांची मागणी यावर थेट परिणाम होणार आहे. त्यामुळे प्रत्येक व्यवसायाने आपली बिलिंग व लेखा प्रणाली वेळेवर अद्ययावत ठेवणे आवश्यक आहे. एकंदरीत, इज डुईंग बिझनेस चांगले आहे. परंतु हा बदल किती उपयोगी ठरेल हे प्रत्यक्ष अंमलबजावणी नंतरच स्पष्ट होईल. यावेळी ठाणे स्मॉल स्केल इंडस्ट्रिज असोसिएशनच्या वतीने आमदार संजय केळकर यांना अभिनंदनाचे पत्र देण्यात आले.यावेळी टिसाच्या माजी अध्यक्षा श्रीमती सुजाता सोपारकर,कार्यकारी समिती सदस्य चंद्रशेखर शेट्टी, कायदेतज्ञ निरव कारिया, जयेश तलरेजा आणि कार्यकारी सचिव एकनाथ सोनवणे आदी उपस्थित होते.

- छाया, मनोज सिंह



**ठाणे :** मुंबई नागपूर समृद्धी महामार्ग तयार होतो. पण मागील पाच वर्षांपासून ठाण्यातील खारेगाव पूलाचे काम पूर्ण होत नाही. भिवंडीहून ठाण्यात पोहचण्यासाठी अडीच ते तीन तास लागतात. वसईहून ठाण्यात पोहचण्यासाठी चार ते साडे चार तास लागतात. ठाण्यातील समस्या संपल्या नाही तर ठाणेकरांना एकत्र करून मोठा लाँग मार्च काढू असा इशारा मनसेचे नेते अविनाश जाधव यांनी दिला.

- छाया, मनोज सिंह



**ठाणे :** ठाण्यातील घोडबंदर रोडवरील वाहतूक कोंडीच्या विरोधात स्थानिक घोडबंदरवासियांनी नागला बंदर परिसरामध्ये रास्ता रोको आंदोलन केले.

- छाया, मनोज सिंह








**ठाणे :** जिजाऊ शैक्षणिक व सामाजिक संस्थेच्या वतीने आज काशिनाथ घाणेकर नाट्यगृह येथे महिलांसाठी मंगळागौर स्पर्धेचे आयोजन तसेच विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या महिलांचा सन्मान जिजाऊ शैक्षणिक सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष निलेश भगवान सांबरे यांच्या उपस्थितीत पार पडला यावेळी मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या.

- छाया, मनोज सिंह

## संपादकीय

### सकारात्मक संबंधांचे लक्षण ?

अमेरिकेचे आतापर्यंतचे धोरण भारताला चीन आणि रशियापासून दूर करणे असे होते. ट्रम्प यांच्या धोरणामुळे भारत आता रशिया आणि चीनच्या जवळ जात आहे. त्याची जाणीव आता ट्रम्प यांना झाली आहे. टॅरिफमुळे खुद्द अमेरिकेत ट्रम्प यांची अडचण झाली. न्यायालयाने त्यांना दणका दिला. अमेरिकेत महागाई वाढण्याची शक्यता निर्माण झाली. मंदीचे सावट तिथे आहे. या पार्श्वभूमीवर ट्रम्प यांची आता बदललेली भूमिका भारत आणि अमेरिका संबंधात सुधारणा होण्यास पूरक ठरणार आहे. भारत आणि अमेरिकेची सकारात्मक आणि भविष्याभिमुख व्यापक आणि जागतिक धोरणात्मक भागीदारी आहे. अमेरिकेसोबत सुरू असलेल्या वादात भारताने अतिशय संतुलित आणि परिपक्व भूमिका घेतली. अमेरिकेने कर लादले, तरी भारताने अमेरिकन वस्तूंवर आयातशुल्क लादून प्रत्युत्तर दिले नाही. फक्त टपालाने पाठवायच्या वस्तूंवर निर्बंध लादले. ट्रम्प यांच्या वादग्रस्त आणि कधी कधी कठोर विधानांवर भारताने तीव्र प्रतिक्रिया दिली नाही; परंतु मौन आणि तर्काच्या आधारे आपली भूमिका स्पष्ट केली. मोदी यांची विधाने संवेदनशीलता आणि संयम दर्शविणारी होती. आता ट्रम्प यांच्या बदललेल्या भूमिकेनंतरही भारत उतावळा झालेला नाही. ट्रम्प यांच्या विधानानंतर मोदी यांनी दिलेला सकारात्मक प्रतिसाद हा ही संशयी आहे. असे असले, तरी भारताची अमेरिकेसोबतची धोरणात्मक भागीदारी म हत्त्वाची आहे; परंतु त्याचे स्वतंत्र परराष्ट्र धोरण आणि धोरणात्मक स्वायत्तता राखणे तितकेच महत्त्वाचे आहे. 'प्रतिष्ठेची रेषा' राखणे हे भारताचे धोरण आहे, म्हणजेच संबंध खोल असले पाहिजेत; परंतु सीमा आणि परस्पर आदरदेखील जपला पाहिजे. जागतिक परिस्थितीत, भारत चीन आणि अमेरिका या दोन्हींमध्ये संतुलन राखण्याचा प्रयत्न करत आहे. चीनला भारताने त्याच्यासोबत सामील होऊन आपला प्रादेशिक प्रभाव वाढवावा असे वाटते, तर अमेरिका भारताला एक मजबूत भागीदार म्हणून पाहते. अमेरिकेचा दबाव स्वीकारूनही, भारताने आपल्या शेती, दुग्धव्यवसाय आणि मत्स्यपालन क्षेत्रात कोणतीही तडजोड केली नाही. त्यामुळे शेतकऱ्यांचे हित जपता येईल.अलीकडेच अमेरिकेचे परराष्ट्र सचिव आणि अमेरिकन दूतावासाने सप्टेंबर महिना हा भारत-अमेरिका संबंध मजबूत करण्याचा महिना म्हणून घोषित केला आणि लोकांना या उपक्रमाला पाठिंबा देण्याचे आवाहन केले. दोन्ही देशांमधील संपर्क वाढवण्याचा आणि सकारात्मक वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न म्हणून हे पाऊल पाहिले गेले. ट्रम्प यांच्या विधानांमध्ये अनेकदा चढ-उतार दिसून येतात. कधी त्यांनी भारताची प्रशंसा केली, कधी टीका केली. त्यामुळे संबंधांमध्ये तणाव निर्माण झाला; परंतु भारताने या चढ-उतारांचा परिणाम होण्याऐवजी आपल्या रणनीतीमध्ये स्थिरता राखली. ट्रम्प यांची सुरुवातीची विधाने भावनिक असतात; परंतु नंतर ते पुनर्विचार करतात. शांघाय सहकार्य परिषदेत भारत, चीन आणि रशियाच्या नेत्यांची एकत्र उपस्थिती आणि परेड प्रदर्शनामुळे ट्रम्प यांना कदाचित असे वाटले असेल, की भारत रशिया आणि चीनच्या जवळ येत आहे, म्हणूनच त्यांनी सुरुवातीला 'भारत आणि रशिया गमावणे' अशा टिप्पण्या केल्या; परंतु नंतर त्यांनी कबूल केले, की भारत पूर्णपणे गमावलेला नाही. मोदी यांच्या सकारात्मक प्रतिसादावरून असे दिसून येते, की भारत संबंधांमधील स्थिरता आणि भविष्यातील दिशेने गंभीर आहे. भारताचे परराष्ट्र धोरण 'डक डिप्लोमसी' वर आधारित आहे, शांत, संयमी आणि व्यावहारिक. म्हणजेच, भारत नकारात्मक वक्तृत्व न करता सकारात्मक पैलू स्वीकारून पुढे जाण्यावर विश्वास ठेवतो. भारत-अमेरिकेतील तणाव निश्चितच कमी होत आहे.भारताने नेहमीच भारत आणि पाकिस्तानमधील कोणत्याही संबंधात किंवा कोणत्याही मुद्द्यात कोणत्याही तृतीय पक्षाची मध्यस्थी किंवा भूमिका नाकारली आहे. भारत अमेरिकेच्या दबावाखाली आपल्या मुख्य हितांशी तडजोड करणार नाही किंवा आपल्या राष्ट्रीय हितांशी तडजोड होईल अशा प्रकारे अमेरिकेच्या मागण्यांसमोर झुकणार नाही, हे आता अमेरिकेला पटले आहे. ट्रम्प यांनी गेल्या महिन्यात भारत-पाकिस्तान संघर्ष संपवण्याचा किंवा त्याचे श्रेय घेण्याचा प्रयत्न केलेला नाही. आज दृष्टिकोन हळूहळू मऊ होत आहे.

**- विकास शिवराम पाटील**


## आजची चित्रोळी



अशीच लाडीगोडी आम्ही
आई जवळ करायचो !
वेळ प्रसंगी गळ्यात पडूनी
हट्ट पुरवण्या रडायचो !!

**मुकुंद कुलकर्णी**


# मराठवाडा मुक्ती संग्राम दिन




आज १७ सप्टेंबर, आजचा दिवस मराठवाडा मुक्ती संग्राम दिन म्हणून साजरा केला जातो. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले मात्र मराठवाडा प्रांत हा पारतंत्र्यातच होता. पूर्वी मराठवाडा हैदराबाद संस्थांनात विलीन होता. हैदराबाद संस्थानावर निजाम उर उस्मान अली खान निजाम उल मुल्क आसफजाह याचे राज्य होते. निजामाने हैदराबाद संस्थान भारतात विलीन करण्यास स्पष्ट नकार दिला होता. मात्र हैदराबाद संस्थानातील जनता भारतात सामील होण्याच्या बाजूने होते. निजामाच्या संस्थानातून मुक्त होऊन भारतीय संघ राज्यात सामील होण्यासाठी स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण हैदराबाद संस्थानात मुक्ती संग्राम आंदोलन सुरू झाले. हैदराबाद संस्थानाची लोकसंख्या त्यावेळी दीड कोटीच्या वर होती. या संस्थांनात तेलंगणा, मराठवाडा आणि कर्नाटकचा काही भाग होता. मुक्ती संग्राम सुरू झाल्यावर निजामाचा सेनापती कासीम रिझवी याने जनतेवर खूप अत्याचार केले. दुसऱ्या बाजूला स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉफ, रविनारायण रेड्डी, बाबासाहेब परांजपे यांच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्य संग्राम वेगात सुरू होता. मराठवाडा मुक्ती संग्राम मराठवाड्यातील गावागावात लढला जात होता. यात हजारो स्वातंत्र्य सैनिक पुढे आले. स्वातंत्र्य सैनिकांच्या प्रदीर्घ लढ्यानंतरही निजाम शरण येत नाही उलट जनतेवरील अन्याय अत्याचार वाढतच आहे हे पाहून १३ सप्टेंबर १९४८ रोजी भारत सरकारने हैदराबाद संस्थानात पोलीस कारवाई सुरू केली. सरदार वल्लभभाई पटेल हे त्यावेळी भारताचे गृहमंत्री होते. ते खूप धाडसी होते त्यांच्या धाडसी आणि अचूक निर्णयाने जनतेस न्याय मिळाला. मुख्य फौजा सोलापूरकडून घुसल्या. पहाटे चार वाजता कारवाई सुरू झाल्यावर २ तासात नळदुर्ग व सायंकाळ पर्यंत तुळजापूर, परभणी ते मणीगड, कनेरगाव भारतीय फौजांनी सर केले. चाळीसगावहुन निघालेल्या फौजेने कन्नड,दौलताबाद काबीज केले. १५ सप्टेंबर रोजी औरंगाबाद सर करून भारतीय फौजा पुढे निघाल्या. भारतीय फौजांपुढे निजामाच्या फौजेचे काही चालले नाही. अखेर १७ सप्टेंबर १९४८ रोजी निजामाचा सेनाप्रमुख जनरल अल इद्रीस याने शरणागती पत्करली. सेनाप्रमुखच शरण गेल्याने निजामही शरण आला. १७ सप्टेंबर १९४८ रोजी हैदराबाद संस्थान निजामाच्या गुलामीतून मुक्त झाले. हैदराबाद मुक्ती संग्राम यशस्वी झाला. हैदराबाद संस्थानावर तिरंगा फडकला. हैदराबाद संस्थानातील निजामाच्या अन्यायी राजवटी विरुद्धचा लढा मराठवाड्यातील जनतेने यशस्वी केला . तेंव्हापासून आजचा दिवस म्हणजे १७ सप्टेंबर हा दिवस मराठवाडा मुक्ती संग्राम म्हणून साजरा केला जातो. मराठवाडा मुक्ती संग्रामात ज्या ज्ञात अज्ञात स्वातंत्र्य सैनिकांनी आपल्या प्राणाची आहुती दिली त्या स्वातंत्र्य सैनिकांना मानाचा मुजरा. सर्व मराठवाडा वासीयांना मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

**- श्याम ठाणेदार**

## विचार पुष्प




# मत्स्यव्यवसायाला कृषीचा दर्जा; शेतकरी व मच्छिमारांसाठी नवी दिशा

महाराष्ट्र राज्याला लांब समुद्रकिनारा आणि अनेक नद्या, धरणे लाभलेली असल्यामुळे येथे समुद्री व गोड्या पाण्यातील मासेमारीला विशेष महत्त्व आहे. हा व्यवसाय किनारपट्टीवरील लोकांसाठी प्रमुख उपजीविका ठरतो, तर ग्रामीण भागात गोड्या पाण्यातील मत्स्यपालनामुळे रोजगार व प्रथिनयुक्त अन्नसुरक्षा मिळते. त्यामुळे राज्याच्या अर्थकारण, पोषण व रोजगारनिर्मितीसाठी मासेमारी गरजेची ठरत आहे.

मत्स्य व्यवसायाला कृषीचा दर्जा देण्यात आला आहे. या निर्णयामुळे मच्छीमार समाज, मत्स्यपालन करणारे शेतकरी आणि एकूणच ग्रामीण अर्थव्यवस्था यांना मोठा फायदा होणार आहे. पारंपरिक शेतीप्रमाणेच आता मत्स्यपालनालाही कृषी क्षेत्रातील अनेक सुविधा, कर्जसवलती आणि शासकीय योजनांचा लाभ घेता येणार आहे.

मत्स्यव्यवसाय हा ग्रामीण आणि किनारपट्टी भागातील प्रमुख उपजीविकेचा स्त्रोत आहे. राज्यातील मोठा समाज समुद्रकिनारी, नद्यांलगत तसेच कृत्रिम तलाव व मत्स्य शेतीवर अवलंबून आहे.

आजवर कृषी व मत्स्यव्यवसाय यांच्यातील धोरणात्मक भेदामुळे मच्छीमारांना कृषी शेतकऱ्यांना मिळणाऱ्या सवलती व कर्जाचा लाभ मिळत नव्हता. या असमानतेचे निराकरण करण्यासाठी शासनाने मत्स्यव्यवसायाला कृषीचा दर्जा देण्याचा निर्णय घेतला आहे.

मत्स्यव्यवसायाला कृषी दर्जा मिळाल्यामुळे मिळणारे फायदे

१. कर्जसुविधा :

मत्स्यपालनासाठी कमी व्याजदराने कर्ज मिळणार.

दीर्घकालीन कर्ज आणि भांडवली गुंतवणुकीसाठी बँकांच्या धोरणांमध्ये सुलभता येणार. किसान क्रेडिट कार्ड मच्छीमारांना ही लागू.

अनुदान आणि योजना :

विविध कृषी योजनांचा लाभ मच्छीमारांना मिळेल.

शेतीसाठी लागू असलेली पायाभूत सुविधा योजनाही मत्स्य व्यवसायात वापरता येईल.

विमा संरक्षण :

कृषी विम्यासारखीच संरक्षण व्यवस्था मत्स्यपालनात लागू.

नैसर्गिक आपत्ती, पाण्याच्या गुणवत्तेत बिघाड यामुळे होणारे नुकसान कमी करण्यास मदत.

तांत्रिक मदत व संशोधन :

मत्स्यपालनासाठी कृषी विद्यापीठे व संशोधन केंद्रांतून मार्गदर्शन मिळेल.

आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढेल.

ग्रामीण रोजगार व अर्थव्यवस्था :

किनारी व ग्रामीण भागात रोजगारनिर्मिती वाढेल.

मत्स्य उत्पादने प्रक्रिया उद्योग, निर्यात वाढविण्याची संधी.

या निर्णयामुळे शेतकरी व मच्छीमार यांच्यातील दरी कमी होईल. ग्रामीण व किनारपट्टी भागातील अर्थव्यवस्थेला चालना मिळेल. राज्याच्या मत्स्य उत्पादनात वाढ होऊन महाराष्ट्र निर्यातीत आघाडी घेणार. युवकांना मत्स्यव्यवसायात आधुनिक तंत्रज्ञानासह नव्या उद्योजकतेच्या संधी उपलब्ध होणार.

मत्स्यव्यवसायाला कृषीचा दर्जा देणे हा महाराष्ट्र शासनाचा दूरदृष्टीचा निर्णय आहे. या निर्णयामुळे मच्छीमार समाजाला केवळ आर्थिक स्थैर्यच नाही तर सामाजिक सन्मानही लाभेल.

कृषी आणि मत्स्यपालन यांची सांगड घालून "जलशेती" हा स्वतंत्र व टिकाऊ व्यवसाय म्हणून विकसित करण्यास मोठी गती मिळेल.

**- हेमंतकुमार चव्हाण**
**विभागीय संपर्क अधिकारी**

पान १ वरून...

### श्री तुळजाभवानी देवी शारदीय...

नवरात्र थीमवर आधारित ३०० ड्रोनद्वारे साकारलेला भव्य लाईट शो या महोत्सवाचे प्रमुख आकर्षण ठरेल.

महाराष्ट्र पर्यटन संचालनालयाच्या अधिकृत संकेतस्थळ आणि युट्यूब चॅनेलवर (https://www.youtube.com/@Maha_rashtraTourismOfficial), महोत्सवाचे थेट प्रक्षेपण उपलब्ध असेल, ज्यामुळे देश-विदेशातील भाविक आणि पर्यटक या उत्सवाचा आनंद घेऊ शकतील. याशिवाय, जबाबदार आणि शाश्वत पर्यटनाला प्रोत्साहन देण्यासाठी व्याख्याने, चित्रकला स्पर्धा आणि मॅरेथॉन यांचे आयोजन करण्यात येईल. फॅम टूरचे आयोजन, पर्यटन विषयक कॉन्क्लेव्ह, फेअर इव्हेंटचे आयोजन करण्यात येईल. या महोत्सवामुळे तुळजापूर परिसरातील नळदुर्ग किल्ला, तेर येथील संत गोरोबा काकांचे मंदिर, येरमाळा येथील येडेश्वरी मंदिर आणि परांडा किल्ला यांसारख्या धार्मिक आणि ऐतिहासिक स्थळांना भेट देणाऱ्या पर्यटकांच्या संख्येत लक्षणीय वाढ होईल. यामुळे स्थानिक पर्यटनाला गती मिळेल आणि परिसरातील अर्थव्यवस्थेला चालना मिळेल.

स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळेल : प्रधान सचिव डॉ. अतुल पाटणे

प्रधान सचिव डॉ.अतुल पाटणे म्हणाले की, श्री तुळजाभवानी देवी शारदीय नवरात्र महोत्सवाला प्रमुख महोत्सवाचा दर्जा देण्याचा हा निर्णय ऐतिहासिक आहे. यामुळे पर्यटनवृद्धीचे उद्दिष्ट साध्य होईल, स्थानिक कलाकारांना प्रोत्साहन मिळेल आणि महाराष्ट्राची धार्मिक व सांस्कृतिक ओळख अधिक दृढ होईल. हा महोत्सव स्थानिक अर्थव्यवस्थेला बळकटी देण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरेल.

महोत्सव महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाचा आणि धार्मिक श्रद्धेचा संगम ठरेल – पर्यटन संचालक डॉ.बी.एन.पाटील

पर्यटन संचालक डॉ. बी. एन. पाटील म्हणाले की, श्री तुळजाभवानी देवी शारदीय नवरात्र महोत्सवाला प्रमुख महोत्सवाचा दर्जा मिळाल्याने महाराष्ट्राच्या पर्यटन क्षेत्राला नवीन दिशा मिळेल. हा महोत्सव केवळ धार्मिक नाही, तर महाराष्ट्राच्या समृद्ध लोककला आणि सांस्कृतिक वारशाला राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर नेण्याचे प्रभावी व्यासपीठ ठरेल. म्हैसूर दसरा महोत्सवाप्रमाणे, या महोत्सवाची प्रसिद्धी मोठ्या प्रमाणात केली जाईल, ज्यामुळे अधिकाधिक पर्यटक आकर्षित होतील.

### 'जेम्स अँड ज्वेलरी' क्षेत्रातील...

राज्य शासन 'इज ऑफ डुइंग बिझनेस'साठी नवीन उद्योगांना परवाना पद्धत, जागा खरेदी प्रक्रिया, सध्याच्या उद्योगांचे बळकटीकरण प्रक्रिया सोपी आणि कमी कालावधीची करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर सुधारणा करीत आहे. त्यासाठी मंत्रालयात 'इज ऑफ डुइंग बिजनेस' वॉर रूमही तयार करण्यात आली आहे. या माध्यमातून सुधारणा प्रकल्प कुठल्या टप्प्यावर आहे, कशा पद्धतीने करायची याबाबत नियमित आढावा घेण्यात येत असून राज्यात उद्योगस्नेही वातावरण निर्माण करण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. या प्रदर्शनाच्या आयोजनामधून भारतीय दागिन्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळण्यासाठी निश्चितच मदत होणार आहे. तसेच या क्षेत्रात नवीन संशोधन होणे गरजेचे आहे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

कार्यक्रमाप्रसंगी गृह राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, आमदार चित्रा वाघ, संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष राजेश रोकडे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाला 'जेम्स अँड ज्वेलरी' क्षेत्रातील व्यावसायिक, व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत महाजनको...

मुख्य सचिव राजेशकुमार, अपर मुख्य सचिव (नवि-१) असीमकुमार गुप्ता, उर्जा विभागाचे अपर मुख्य सचिव आभा शुक्ला, मुख्यमंत्री कार्यालयाच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे, महाजेनकोचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक राधाकृष्णन बी, 'नामप्रविप्रा'चे महानगर आयुक्त संजय मीणा आदी उपस्थित होते.

महाजेनको कंपनीने भाडे कराराने दिलेली जागा मौजा कोराडी, मौजा महादुला, मौजा खापरखेडा, मौजा नांदा (तालुका कामठी) आणि मौजा घोगली ता. नागपूर (ग्रामीण) या भागात आहे. ही जमीन नैसर्गिक संसाधनांच्या सान्निध्यात असून, जागतिक दर्जाचे पर्यावरणीय पर्यटन स्थळ विकसित करण्यासाठी उपयुक्त आहे. या उपक्रमाचा मुख्य आधार शाश्वत जलकेंद्रित विविध कार्यक्रम आहे. नॉन-मोटरायइड बोटिंग (पॅडल बोट्स, कायाक्स, कॅनू), पर्यावरणपूरक शिकारा आणि फ्लोटिंग डेक राइड्स, फ्लोटिंग प्लॅटफॉर्मवरून पक्ष्यांचे निरीक्षण, निसग पर्यटन हे उपक्रम या ठिकाणी राबविण्यात येणार आहेत.

प्राधिकरणाला दिलेली जमीन ही नागपूरच्या महत्त्वाच्या शहरी आणि नैसर्गिक संसाधनांच्या जवळ असल्यामुळे, जागतिक दर्जाचे पर्यावरण पर्यटन स्थळ म्हणून तिचा विकास केला जाणार आहे. हा उपक्रम पर्यटन उद्योगास चालना देईल, स्थानिक लोकांना रोजगाराच्या नवीन संधी देईल व परिसराचा सामाजिक-आर्थिक विकास सशक्त करेल, प्रकल्प उभारणीत पर्यावरण संरक्षणाच्या सर्व नियमांचे काटेकोर पालन करण्यात येईल, अशी माहिती यावेळी देण्यात आली.

**सामंजस्य कराराचे तपशील**

कराराची मुदत : सुरुवातीला ३० वर्षे, वार्षिक केवळ १ रुपये भाडे, व त्यानंतर वाढीव मुदतीचा पर्याय उपलब्ध

महाजनकोचे अधिकार : सध्याच्या थर्मल पॉवर स्टेशन आणि सांडपाणी प्रक्रिया केंद्र यांच्यावर पूर्ण मालकी व नियंत्रण कायम राहणार.

प्राधिकरणाचे अधिकार : तलावाच्या जलपृष्ठभागाचा वापर फक्त पर्यावरण पर्यटन प्रकल्पासाठी करण्याचे विशेष हक्क एनएमआरडीएला दिले जातील.

महाजनकोच्या संचालक मंडळाने या प्रस्तावास मान्यता दिली आहे.

### राष्ट्रीय पोषण माह'च्या माध्यमातून...

माध्यमातून पोषण अभियान कार्यक्रमाची अंमलबजावणी ग्रामीण, आदिवासी व नागरी क्षेत्रातील एकूण ५५३ बाल विकास प्रकल्पातील एक लाख १० हजार ६२९ केंद्रात राबविण्यात येते. एकात्मिक बालविकास सेवा योजनेअंतर्गत ६ महिने ते ३ वर्ष वयोगटातील २५ लाख ८२ हजार ३३० बालके, ३ ते ६ वयोगटातील २४ लाख ७४ हजार ४१७ बालके, ४ लाख ३२ हजार २३४ गरोदर महिला व ४ लाख २३ हजार ७५६ स्तनदा माता या योजनेचा लाभ घेत आहेत.

महाराष्ट्र राज्याने पोषण अभियानांतर्गत मागील सात वर्षांत उल्लेखनीय कामगिरी करत राष्ट्रीय स्तरावर पहिल्या तीन क्रमांकांमध्ये सातत्याने स्थान मिळवले आहे. विशेष म्हणजे सन २०२४ मध्ये राज्याने देशात प्रथम क्रमांक पटकावला होता. यावर्षी देखील विविध जनजागृती उपक्रम, वेबिनार, दूरदर्शनवरील कार्यक्रम तसेच जन आंदोलन डॅशबोर्डच्या माध्यमातून नागरिकांचा व्यापक सहभाग सुनिश्चित करून पोषणयुक्त महाराष्ट्र आणि सुपोषित भारत घडविण्याचा संकल्प आहे.

# डोहोळे ग्रामपंचायतची विविध सोयीसुविधा उपयुक्त घौडदौड!

**वासिंद (पंडीत मसणे) :** येथील डोहोळे ग्रामपंचायतीनी विविध उपक्रम राबविण्याबरोबरच उपयुक्त सुविधा निर्माण करीत ग्रामपंचायत कारभार सुसज्ज बनवून ग्रामपंचायत विभागांनी ग्रामस्थांच्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न केल्याचे दिसून येते.

गेल्या दोन वर्षांपासून ग्रुप ग्रामपंचायत डोहोळे या ग्रामपंचायत विभागाची घौडदौड सुरू असून यामध्ये विविध पुरस्कार प्राप्त करून या ग्रामपंचायत विभागांनी विविध उपक्रम हाती घेत ग्रामस्थांसाठी अनेक सोईसुविधा उपलब्ध केलेल्या दिसून येत आहेत. यामुळे नागरिकांना आपल्या विविध कामकाज व समस्या निर्वारणसाठी सोईस्कर झाले आहे.








डोहोळे या ग्रुप ग्रामपंचायत मध्ये डोहोळे, कोशिंबी, कळंबोली, आन्हे व सोर हे गांव-पाडे आहेत. सदर ग्रामपंचायत विभागांनी पुढाकार घेत विविध उपक्रम व सोईसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न केले आहेत. येथील नागरिकांना स्वस्त दरात शुद्ध पाणी मिळावे यासाठी वॉटर एटीएम व इलेक्ट्रीक मोटार सायकलसाठी ई-चार्जिंग स्टेशन सुरू केले आहे तर महिलां करीता सॅनिटरी (नॅपकीन) पॅड मशिन उपलब्ध करून या वापरानंतर त्या विल्हेवाटसाठी वेंडिग यंत्र (मशिन) बसविण्यात आले आहे. तसेच पाण्याची पातळी वाढावी यासाठी ग्रामपंचायत छतावरील पाणी रेन वॉटर हार्वेस्टिंग द्वारे बोअरवेलमध्ये सोडून ग्रामपंचायत मध्ये निर्माण होणारा ओला कचऱ्यापासून बायोगॅस तयार करून कार्यालयातील किचन मध्ये वापरले जात आहे. कार्यालया सभोवती संरक्षण भिंत बांधून व रंगरंगोटी करून यावर विविध संदेश देणारे सुविचार, कार्यालय आवारात विविध झाडे व फुलझाडे वृक्षारोपण नर्सरी, गांडूळ खत निर्मिती तर विविध रोपांची वाफे तयार करून कार्यालयात भाजीपाला उपयोग केला जात आहे.

त्याचबरोबर, टाकाऊ पदार्थ, कचरा वापरण्यायुक्त छोटे प्रकल्प तयार करून शोभेच्या वस्तू बनविण्यासाठी वापर केला जात आहे. तर कार्यालयात सिसिटिव्हि, तक्रारपेटी, माहिती अधिकार व विविध दाखले माहिती फळक, ओळा-सुका कचरापेटी, नागरीकांसाठी आसनव्यवस्था व घरपट्टी, पाणीपट्टी आरोग्यकर, दिवाबत्ती वसुली करीता डिजिटल स्कॅनर उपलब्ध अशा विविध सोयीसुविधा उपलब्ध करून सुसज्ज बनविल्याचे दिसून येते.

दरम्यान, ठाणे जिल्हा परिषद कडून आर.आर.(आबा) पाटील सुंदर गांव योजनेंतर्गत 'तालुका सुंदर गांव' दहा लाखांचा पुरस्कार या ग्रामपंचायतीला प्राप्त झाला आहे. तर 'माझी वसुंधरा अभियान' मध्येही चांगले काम केलेले असून याच योजनेत चाळीस लाखांचा जिल्हा स्तरावर प्रथम पुरस्कार व संत गाडगेबाबा महाराज ग्रामस्वच्छता अभियान अंतर्गत राष्ट्र संत तुकडोजी महाराज या स्पर्धेत जिल्हा स्तरीय प्रथम पुरस्कार घोषित झाले असून येत्या 17 सप्टेंबर पासून सुरू होत असलेल्या मुख्यमंत्री समृध्द पंचायत राज अभियान सहभागसाठी तयारी सुरू केली असल्याची माहिती ग्रामपंचायत प्रशासन विभागांनी दिली आहे.

तर ग्रामपंचायत समिती यांच्या प्रयत्नामुळे, ग्रामपंचायत प्रशासन, ग्रामस्थ यांच्या सहकार्याने व वरिष्ठांच्या मार्गदर्शनाने ग्रामपंचायत माध्यमातून विविध विकासात्मक कामे व सोईसुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे ग्रामविकास अधिकारी परेश सोनावणे यांनी म्हटले.




**ठाणे : ठाण्यातील हाईलँड सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलने ट्रायजेमिनल न्युराल्जिया या दुर्मिळ व अत्यंत वेदनादायक आजाराने ग्रस्त असलेल्या दोन रुग्णांवर यशस्वी शस्त्रक्रिया करून त्यांना नवे जीवन दिले आहे. "सुसाईड डिसीज" म्हणून ओळखला जाणारा हा आजार चेहऱ्यावरील तीव्र वेदना साठी कुप्रसिद्ध आहे. हाईलँड सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये दोन ट्रायजेमिनल न्युराल्जिया रुग्णांवर यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आले आहे अशी महती पत्रकार परिषदेत देण्यात आली.**

**- छाया , मनोज सिंह**



**ठाणे : पाळीव प्राण्यांच्या नैसर्गिक आरोग्यवर्धनासाठी नाविन्यपूर्ण उपाययोजना करणारी नोव्हाकुर्रो नॅचरल्स ही स्वदेशी कंपनी नव्या उत्साहाने पुढे सरसावत आहे.**

**- छाया, मनोज सिंह**



**ठाणे : नवरात्र उत्सवासाठी ठाण्यात बांबूच्या टोपल्या विक्रीसाठी बाजारात विक्रेते दाखल झाले आहेत. जळगाव, भुसावळ येथून हे कारागीर आले आहेत.**

**- छाया, मनोज सिंह**

# डोंबिवली, ठाणे परिसरातील ७० महिला शिक्षिका आदर्श शिक्षिका पुरस्काराने सन्मानित

**डोंबिवली :** जनरल एज्युकेशन शिक्षण संस्थेच्या कल्याण पश्चिम जोशी बाग येथील एसएनडीटी महिला महाविद्यालयाशी संलग्न महिला महाविद्यालयातर्फे ठाणे, डोंबिवली, कल्याण परिसरातील विविध शाळांमधील उपक्रमशील ७० महिला शिक्षिकांना त्यांच्या शिक्षण सेवेतील उल्लेखनीय कारकिर्दीबद्दल आदर्श शिक्षिका पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.



महिला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र करनकाल आणि आयुष ॲकेडमीच्या संचालिका आदिती अजय चौधरी यांनी या उपक्रमाचे आयोजन केले होते. ठाणे, कल्याण, डोंबिवली परिसरातील बहुतांशी शाळांमध्ये पुरूष शिक्षिकांबरोबर महिला शिक्षिकाही अधिक संख्येने विद्यार्थ्यांना घडविण्याचे काम करतात. या शिक्षिकांमधील अनेक शिक्षिका विविध प्रकारचे विद्यार्थी, शालेय हिताचे उपक्रम राबवून विद्यार्थ्यांमधील गुणवत्ता, त्यांची कौशल्ये वाढविण्याचे काम करतात. क्रमिक अभ्यासक्रमा बरोबर शिक्षिका आवड म्हणून हे काम करतात. अशा गुणवंत महिला शिक्षिकांचा शिक्षक दिनी सन्मान करावा म्हणून जनरल एज्युकेशन इन्स्टिट्यूटच्या महिला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. करनकाल आणि आयुष ॲकेडमीच्या प्रमुख आदिती चौधरी यांनी महिला शिक्षिकांच्या सन्मानाचे एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्याचे ठरविले. त्यामधून या कार्यक्रमाची आखणी करण्यात आली.

डोंबिवलीतील छत्रपती शिक्षण मंडळाच्या श्री. रा. साठे विद्यालयाच्या प्राथमिक विभागाच्या चिटणीस भारती वेदपाठक, मुख्याध्यापिका मंदाकिनी पोखरकर, रेश्मा देशपांडे, निलिमा वैद्य, महिला शिक्षिका मृणाल खेडकर, नितुशा हेडावु, पल्लवी चौधरी, आश्लेषा जाधव, संपदा पोतकर, नयना गवारी, मीनाक्षी शिर्के, उमा देसाई, सुवर्णा मागाडे आणि शिक्षक दत्तात्रय कौल्हे यांचा आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमात ठाणे, कल्याण, डोंबिवली परिसरातील अनेक शाळांमधील ७० शिक्षिकांना आदर्श शिक्षिका पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

शाळांमध्ये इतर शिक्षिकांबरोबर महिला शिक्षिकाही विद्यार्थ्यांना घडविण्याचे महत्वपूर्ण काम करत आहेत. घर, शाळा अशा अनेक आघाड्या सांभाळून तारेवरची कसरत करत शिक्षिका ही जबाबदारी पार पाडतात.

# एमटीडीसीच्या पहिल्या डिजिटल 'ई-ब्रोशर'चे पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांच्या हस्ते लोकार्पण

**मुंबई :** महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ (एमटीडीसी) तर्फे तयार करण्यात आलेल्या पहिल्या-वहिल्या डिजिटल ई-ब्रोशरचे लोकार्पण पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांच्या हस्ते करण्यात आले.

सह्याद्री अतिथीगृह येथे महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या १७५ व्या संचालक मंडळाच्या बैठकीनंतर हा कार्यक्रम संपन्न झाला. या उपक्रमाची संकल्पना व नेतृत्व पर्यटन विभागाचे प्रधान सचिव डॉ. अतुल पाटणे यांनी केले. या प्रकल्पासाठी मार्गदर्शन एमटीडीसीचे व्यवस्थापकीय संचालक निलेश र. गटणे यांनी केले. या लोकार्पण सोहळ्यास एमटीडीसीचे महाव्यवस्थापक चंद्रशेखर जयस्वाल, प्रसिद्धी विभागप्रमुख मानसी कोठारे यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

पर्यटन मंत्री शंभुराज देसाई म्हणाले की, महाराष्ट्र पर्यटनाला जागतिक स्तरावर पोहोचविण्यासाठी डिजिटल माध्यमांचा वापर अत्यंत महत्त्वाचा आहे. या ई-ब्रोशरमुळे पर्यटकांना थेट आरक्षणाची सोय तर मिळेलच, तसेच आपल्या वर्तमान




स्थानावरून पर्यटक निवास किती अंतरावर आहे, हेही सहज तपासता येईल. त्यामुळे पर्यटन अनुभव अधिक सुलभ व सोयीस्कर होईल.प्रधान सचिव डॉ. अतुल पाटणे म्हणाले की, ई-ब्रोशरद्वारे महाराष्ट्रातील पर्यटनस्थळांची माहिती आधुनिक व सुलभ स्वरूपात उपलब्ध होत असून, पर्यटकांना प्रवास नियोजनात मोठी मदत होणार आहे.

व्यवस्थापकीय संचालक निलेश र. गटणे म्हणाले की, पर्यटकांच्या सोयीसाठी फ्लिप-बुक स्वरूपासह विविध डिजिटल माध्यमांवर ई-ब्रोशर उपलब्ध करून देण्यात आले असून, ही संकल्पना पर्यटनाच्या प्रसाराला नवी दिशा देणारी ठरणार आहे.

**ई-ब्रोशर विविध वैशिष्ट्यांनी समृद्ध**

पर्यटकांना एमटीडीसीच्या विविध पर्यटन निवासस्थानांसाठी थेट ऑनलाइन बुकिंग करण्यासाठी सोयीस्कर दुवे उपलब्ध करून देण्यात आले आहेत. यामुळे आरक्षण प्रक्रिया जलद, पारदर्शक आणि वापरकर्त्यास अनुकूल झाली आहे. महाराष्ट्रातील पर्यटनस्थळांची ऐतिहासिक, सांस्कृतिक, नैसर्गिक व भौगोलिक वैशिष्ट्ये यांचा सविस्तर आढावा या ई-ब्रोशरमध्ये देण्यात आला आहे. प्रत्येक स्थळासाठी अक्षांश-रेखांश (Latitude-Longitude) नमूद केल्यामुळे पर्यटकांना प्रवास नियोजन करणे अधिक सोयीचे ठरणार आहे.या ई-ब्रोशरमध्ये माहितीबरोबरच छायाचित्रे, दृश्यात्मक मांडणी व प्रभावी मजकूराचा संगम साधला आहे. यामुळे वाचकांना पर्यटन स्थळांची माहिती रोचक व प्रभावी पद्धतीने मिळणार आहे. ई-ब्रोशर हे एमटीडीसीच्या अधिकृत संकेतस्थळावर (Website) तसेच विविध डिजिटल माध्यमांद्वारे उपलब्ध करून देण्यात येणार आहे. याशिवाय, व्हॉट्सॲप व सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरूनही ते सहज शेअर व डाउनलोड करता येईल.

पर्यटकांना ई-ब्रोशर सहज वाचता यावे यासाठी याची फ्लिप-बुक पद्धतीतील आवृत्ती देखील तयार करण्यात आली आहे.

# प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त राज्यात स्वच्छता अभियानाची सुरुवात

**मुंबई :** प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त महाराष्ट्रात कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्यावतीने 'स्वच्छता अभियान' राबविण्यात येणार आहे. कौशल्य मंत्री मंगल प्रभात लोढा यांच्या पुढाकारामुळे राज्यातील ४१९ शासकीय औद्योगिक संस्थांमधून हजारो विद्यार्थी एकत्र येणार असून, तब्बल ७५० गावांमध्ये स्वच्छता अभियान राबवणार आहेत. या उपक्रमाचा शुभारंभ बुधवार, १७ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता पनवेल तालुक्यातील गव्हाण ग्रामपंचायत कार्यालयासमोर होणार आहे. या अभियानाचे प्रमुख मार्गदर्शक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस असून, उद्धाटन कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा यांच्या हस्ते होणार आहे.

या अभियानाबाबत बोलताना मंत्री लोढा म्हणाले, "विकसित भारताचा संकल्प साकार करण्यातील एक महत्वाचा टप्पा स्वच्छ भारत अभियान हा आहे. भारत स्वच्छ करण्याचा निर्धार पंतप्रधानांनी केला असून, त्यासाठी एकत्र येण्याचे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सुद्धा केले आहे. त्यामुळे आदरणीय मुख्यमंत्र्यांच्या मार्गदर्शनाखाली कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभागामार्फत हा उपक्रम सुरु करत आहोत. स्वच्छता, आरोग्य या विषयांबाबत आजही जागृतीची गरज आहे आणि ती गरज या अभियानाच्या माध्यमातून पूर्ण करण्यात येत आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या स्वच्छ भारताचा निर्धार पूर्ण करण्यासाठी महाराष्ट्राच्या कौशल्य विकास विभागाद्वारे विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. भारतातील पहिली संत गाडगे बाबा स्वच्छ भारत अकादमी महाराष्ट्रात सुरु करण्यात आली असून, याद्वारे हजारो तरुणांना प्रशिक्षण आणि रोजगार मिळत आहे.

स्वच्छता आरोग्यासाठी अतिशय महत्वाची आहे हे आपण जाणतोच, पण भारतासारख्या प्रचंड लोकसंख्या असलेल्या देशाला स्वच्छ ठेवण्यासाठी गरज आहे ती जनजागृतीची आणि कुशल मनुष्यबळाची. या दोन्ही गोष्टींसाठी महाराष्ट्राचा कौशल्य विकास विभाग तत्परतेने पुढाकार घेत राहील, असे मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी स्पष्ट केले.

# जिल्हा परिषदेत अनेक शासकीय अभियानांच्या पूर्वतयारीसंदर्भात पत्रकार परिषद

**“मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानासोबत सेवा पंधरवडा, स्वच्छता ही सेवा, स्वस्थ नारी – सशक्त परिवार अभियान, हरित महाराष्ट्र अभियान व राष्ट्रीय पोषण माह या अभियानात ग्रामस्थांनी सहभाग घ्यावा”- मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे**



**ठाणे :** ग्रामीण विकास व पंचायत राज प्रणालीला बळकटी देणे, नागरिकांना शासनाच्या सेवा थेट उपलब्ध करून देणे, आरोग्य व पोषण जनजागृती वाढविणे तसेच स्वच्छता, लोकसहभाग यावर आधारित विविध राज्य व केंद्र शासनाच्या महत्वाकांक्षी अभियानांची ठाणे जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी होणार आहे. यासंदर्भातील पत्रकार परिषद आज, दि. १६ सप्टेंबर रोजी जिल्हा परिषदेच्या मुख्यालयात जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली.

**मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान**

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी माहिती देताना सांगितले की, “मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान” हे ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषदांना कामगिरीनुसार प्रोत्साहित करून समृध्द ग्रामीण भाग करण्यासाठी अभियान राबविले जात आहे.

सन २०२५-२६ पासून तालुका, जिल्हा, महसूल विभाग व राज्य या चार स्तरांवर उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पंचायत राज संस्थांना पुरस्कार दिले जाणार आहेत. या अभियानात सुशासन, सक्षम पंचायत, जलसमृद्ध व स्वच्छ गाव, सामाजिक न्याय, उपजीविका विकास, लोकसहभाग आणि नाविन्यपूर्ण उपक्रम या प्रमुख घटकांवर विशेष भर देण्यात येणार आहे.

**अभियानाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत:-**

1. विकसित महाराष्ट्र २०४७ करिता पंचायत राज संस्था अधिक गतीमान करणे.
2. ग्रामपंचायतींमध्ये विकासाची निकोप स्पर्धा घडविणे.
3. अभियान कालावधी : १७ सप्टेंबर २०२५ ते ३१ डिसेंबर २०२५.
4. विकासाला लोकचळवळीचे स्वरूप देणे.
5. विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करणे.
6. पुरस्कारासाठी एकूण तरतूद : २४५.२० कोटी रुपये
7. ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद या स्तरावर मिळून एकूण १,९०२ पुरस्कारांचे वितरण.

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार व प्रधान सचिव (भा.प्र.से) एकनाथ डवले यांच्या विशेष मार्गदर्शनाखाली हे अभियान राबविण्यात येत आहे. ग्रामपंचायत, बांधकाम, शिक्षण, महिला व बाल कल्याण, पशुसंवर्धन, DRDA, MSRLM, महसूल, कृषि, समाजकल्याण, आरोग्य, पाणी पुरवठा, स्वच्छ भारत मिशन, जलसंधारण, मनरेगा अशा विविध विभागांचा सहभाग घेऊन तालुकास्तर व ग्रामस्तरावर विविध पुरस्कार मिळविण्यासाठी संबधित यंत्रणेमार्फत योग्य कार्यवाही केली जाणार आहे.

जिल्हा स्तरावरील अभियान शुभारंभ ग्रामपंचायत खोणी, पंचायत समिती कल्याण येथे दिनांक १७ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ८:४५ वाजता आयोजित करण्यात आला आहे. तसेच १७ सप्टेंबर, २०२५ रोजी सर्व ग्रामपंचायतीमध्ये विशेष ग्रामसभा आयोजित करण्यात येणार आहे. महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पालक मंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते या कार्यक्रमाचे शुभारंभ होणार आहे. तसेच जिल्ह्यातील सर्व मा. खासदार व मा. आमदार त्यांच्या कार्यक्षेत्रात उपस्थित राहून अभियानाचे शुभारंभ करणार आहेत.

**हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र अभियान**

मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी सांगितले की, “हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र अभियान” अंतर्गत वृक्षारोपण, शाश्वत हरितीकरण, जलसंधारण आणि पर्यावरणपूरक उपक्रमांवर विशेष भर दिला जात आहे. स्थानिक संस्था, शाळा, स्वयंसेवी संघटना आणि ग्रामस्थांचा या अभियानात मोठ्या प्रमाणात सहभाग राहील.

राज्यात वृक्षाच्छादन वाढविण्यासाठी “हरित महाराष्ट्र – समृद्ध महाराष्ट्र” या अभियानांतर्गत वर्ष २०२५ मध्ये १० कोटी वृक्ष लागवड लोकचळवळ उभी करण्यात येणार आहे.

त्याअनुषंगाने, ग्रामविकास विभागाच्या दि. २८ जुलै, २०२५ च्या शासन निर्णयानुसार एकूण १ कोटी वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. यापैकी ठाणे जिल्हा परिषदेस १,५४,३०० वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. या अंतर्गत ठाणे जिल्ह्यातील ५ तालुक्यांमधील सर्व ग्रामपंचायतींमध्ये दिनांक १७ सप्टेंबर, २०२५ रोजी एकत्रित वृक्षारोपण मोहिमेचे नियोजन करण्यात आले आहे.

**सेवा पंधरवडा**

उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.वि.) अविनाश फडतरे यांनी सांगितले की, भारत सरकारतर्फे १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर दरम्यान सेवा पंधरवडा साजरा केला जातो. यामध्ये आरोग्य शिबिरे, पोषण उपक्रम, रक्तदान शिबिरे, स्वच्छता अभियान तसेच शासकीय सेवा थेट नागरिकांपर्यंत पोहोचविण्यावर भर दिला जाणार आहे. जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायती व संस्थांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करण्यात येणार आहे.

**स्वच्छता ही सेवा**

उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पा.पु.) पंडित राठोड यांनी स्पष्ट केले की, या वर्षीच्या स्वच्छता ही सेवा अभियानाची थीम “स्वच्छोत्सव” असून १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर दरम्यान हा पंधरवडा राबवला जाणार आहे.

यामध्ये स्वच्छता लक्ष युनिट्स (CTUs) स्थापन करून अस्वच्छ ठिकाणांची साफसफाई, सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता, सफाई मित्र सुरक्षा शिबिरे, “एक दिवस – एक तास – एक साथ” उपक्रमाअंतर्गत २५ सप्टेंबर रोजी महाश्रमदान तसेच विशेष ग्रामसभेद्वारे स्वच्छ सुजल गाव घोषीत करणे यांचा समावेश आहे.

**स्वस्थनारी–सशक्तपरिवारअभियान**

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे यांनी सांगितले की, १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ दरम्यान “स्वस्थ नारी – सशक्त परिवार अभियान” राबवले जाणार आहे.

यामध्ये महिलांची सर्वांगीण आरोग्य तज्ञ डॉक्टर मार्फत वैद्यकीय तपासणी, कर्करोग व मधुमेह निदान, माता व बाल संरक्षण कार्ड वितरण, लसीकरण, मासिक पाळी स्वच्छता व पोषण सत्र, क्षयरुग्णांना दत्तक घेण्यासाठी “निक्षय मित्र अभियान”, तसेच रक्तदान शिबिरे यांचा समावेश असेल. आभा (ABHA) कार्ड व प्रधानमंत्री जनआरोग्य योजना (PM-JAY) नोंदणीची सुविधाही उपलब्ध करून दिली जाणार आहे.

**राष्ट्रीय पोषण माह**

महिला व बालकल्याण अधिकारी श्री. संजय बागुल यांनी सांगितले की, यावर्षी १७ सप्टेंबर ते १६ ऑक्टोबर दरम्यान “राष्ट्रीय पोषण माह” साजरा होणार आहे.

लठ्ठपणा नियंत्रण, पोषण भी – पढ़ाई भी, एक पेड माँ के नाम, बालक आहार पद्धती, Men-Streaming आणि Vocal for Local या सहा प्रमुख थीम्स अंतर्गत विविध कार्यक्रम जिल्ह्यात राबवले जातील. विशेषतः स्थानिक आहाराला प्रोत्साहन, तृणधान्ययुक्त पदार्थांचा प्रसार, पोषण वाटिका, महिला कलाकारांना व्यासपीठ आणि बालकांच्या पोषणाविषयी जनजागृती या गोष्टींवर भर दिला जाणार आहे.या सर्व अभियानांचा उद्देश ठाणे जिल्ह्यात ग्रामपंचायतींमार्फत लोकसहभागातून शासनाच्या योजना प्रभावीपणे राबवणे, स्वच्छता, आरोग्य, पोषण, पर्यावरण व ग्रामविकास यांचा समन्वय साधणे आणि ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास साधणे असून ठाणे जिल्हा परिषदेमार्फत ठाणे जिल्ह्यातील ग्रामस्थांना या अभियानात सक्रिय सहभाग नोंदवण्यासाठी आवाहन करण्यात येत आहे.

## स्वस्थ नारी सशक्त परिवार अभियानात ठाणे महापालिकेची महिला व बालकांसाठी विविध आरोग्य तपासणी शिबिरे

- बुधवार, १७ सप्टेंबर रोजी होणार उद्‌घाटन
- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उद्‌घाटनपर भाषणाचे होणार थेट प्रक्षेपण
- अभियानाची ठाण्यातील सुरूवात लोकमान्य टिळक नर्सिंग होम, कोरस रुग्णालय येथून होणार

**ठाणे :** आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयातर्फे राबविण्यात येत असलेल्या 'स्वस्थ नारी सशक्त परिवार' या अभियानाअंर्तगत ठाणे महापालिकेतर्फे महिला व बालकांसाठी विविध आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित करण्यात येत आहेत. १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ या काळात राबवण्यात येणाऱ्या या अभियानाची ठाण्यातील सुरूवात बुधवार, १७ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजल्यापासून वर्तकनगर येथील लोकमान्य टिळक नर्सिंग होम (कोरस रुग्णालय) येथून होणार आहे.

स्त्रियांचे आरोग्य आणि सबलीकरण हे आपल्या कुटुंबांचे, समाजाचे आणि अखेरीस संपूर्ण राष्ट्राच्या प्रगतीचा केंद्रबिंदू असतो. त्या अनुषंगाने आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयातर्फे 'स्वस्थ नारी सशक्त परिवार' या अभियानाची आखणी करण्यात आली आहे. त्याचा शुभारंभ बुधवार, १७ सप्टेंबर रोजी इंदौर, मध्य प्रदेश येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे. त्या समारंभाचे थेट प्रक्षेपण लोकमान्य टिळक नर्सिंग होम, कोरस रुग्णालय येथे करण्यात येणार असून त्यास लोकप्रतिनिधी, डॉक्टर, आरोग्यसेविका आदी उपस्थित राहणार आहेत.

**महापालिकेच्या नागरी आरोग्य केंद्रात शिबिरे**

ठाणे महापालिकेच्या सर्व नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये 'स्वस्थ नारी सशक्त परिवार' हे अभियान राबविण्यात येणार आहे. त्या अंतर्गत होणाऱ्या आरोग्य शिबिरांमध्ये महिलांसाठी वेगवेगळ्या आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यात येतील.

**याची होणार तपासणी, होणार समुपदेशन**

उच्च रक्तदाब, मधुमेह, कर्करोग, ह्दयरोग आदी असंसर्गजन्य रोगांचे तपासणी शिबीर, नेत्र तपासणी, दंत तपासणी, माता व बाल आरोग्य शिबीर, महिला व बालकांसाठी पोषण जागरुकता सत्रे, आयुष आणि योग शिबिरे, क्षयरोग जागरुकता आणि तपासणी शिबिरे, रक्तदान शिबीर, अवयवदान प्रतिज्ञा, मोफत औषध वितरण, मानसिक आरोग्य समुपदेशन, व्यसनमुक्ती शिबीर, किशोरवयीन मुली आणि महिलांसाठी रक्तक्षय तपासणी आणि समुपदेशन, क्षयरोग तपासणी, सिकलसेल रोग तपासणी यांचे आयोजन सर्व नागरी केंद्र येथे करण्यात येणार आहे.

**महिला व बालक यांना लाभ घेण्याचे आवाहन**

स्वस्थ नारी सशक्त परिवार अभियानात होणाऱ्या आरोग्य शिबिराचा लाभ शहरातील सर्व महिला तसेच गरोदर माता व सर्व लहान बालकांन होणार असून त्याचा जास्तीत जास्त लाभ करून घ्यावा, असे आवाहन ठाणे महापालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत करण्यात आले आहे.

## ठाणे जिल्ह्यात जनावरांच्या लाळ-खुरकूत (FMD) प्रतिबंधासाठी लसीकरण मोहीम सुरू



**ठाणे (मिहिर म्हात्रे) :** ठाणे जिल्ह्यातील पशुपालक, गोपालक आणि शेतकऱ्यांसाठी एक महत्त्वाची मोहीम राबविण्यात येत आहे. २० व्या पशूगणनेनुसार जिल्ह्यात एकूण १,७२,०४३ जनावरे नोंदवली गेली असून, या जनावरांचे आरोग्य सुरक्षित ठेवण्यासाठी आणि संसर्गजन्य आजारांपासून बचाव करण्यासाठी लाळ-खुरकूत (FMD) लसीकरण मोहीम सुरु करण्यात आली आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अजिंक्य पवार, प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन मुंबई डॉ. प्रशांत कांबळे यांच्या विशेष मार्गदर्शनाने लसीकरण मोहीम सुरू केली आहे.

जिल्ह्यातील सर्व पशुवैद्यकीय दवाखान्यांमध्ये लाळ-खुरकूत रोग प्रतिबंधक लसीचा पुरेसा साठा उपलब्ध करून देण्यात आला आहे. त्यामुळे पशुपालकांना आपल्या जनावरांचे लसीकरण करण्यासाठी जवळच्या पशुवैद्यकीय केंद्राशी संपर्क साधून ही सुविधा घेता येणार आहे. या मोहिमेचा उद्देश जनावरांना रोगमुक्त ठेवणे, त्यांची उत्पादनक्षमता वाढविणे आणि शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान टाळणे हा आहे.


या संदर्भात जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. वल्लभ जोशी यांनी सांगितले की,“ही लस ३ महिन्यांपेक्षा जास्त वयाच्या सर्व निरोगी वासरे, बैल, रेडे, गायी-म्हशी तसेच गाभण जनावरांना देता येते. पशुपालकांनी अजिबात विलंब न करता आपल्या जनावरांचे लसीकरण करून घ्यावे. रोग प्रतिबंधक उपाययोजना राबविणे ही केवळ शासकीय जबाबदारी नसून सर्वांचीच सामूहिक जबाबदारी आहे.”

डॉ. जोशी यांनी पुढे सांगितले की, शेतकऱ्यांच्या सहकार्यामुळे ही मोहीम यशस्वी होईल आणि ठाणे जिल्ह्यातील पशुधन अधिक निरोगी व सक्षम बनेल. एकत्रित प्रयत्नांमुळे ठाणे जिल्हा रोगमुक्त आणि आरोग्यदायी पशुधन असलेला आदर्श जिल्हा ठरेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

# अहिल्यानगर-बीड-परळी वैजनाथ’ रेल्वेमार्ग प्रकल्पासाठी 150 कोटी निधी वितरित;

## बीडकरांना पालकमंत्री अजित पवार यांच्याकडून मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाची भेट

**मुंबई (सुचित शिंदे) :** बीड जिल्ह्याच्या विकासात गेम चेंजर ठरणाऱ्या ‘अहिल्यानगर-बीड-परळी वैजनाथ’ या महत्त्वाकांक्षी नवीन ब्रॉडगेज रेल्वेमार्ग प्रकल्पाला गती देण्यासाठी राज्य शासनाने आजवर तब्बल 2 हजार 91 कोटी रुपये उपलब्ध करून दिले आहेत. त्यात नव्याने 150 कोटींची भर घालून हा निधी वितरीत करण्यात आला आहे. या निधीच्या वितरणामुळे या रेल्वे प्रकल्पाच्या कामाला अधिक गती मिळणार असून, बीडकरांना उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाची अनोखी भेट दिली आहे. मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या मुहूर्तावर, म्हणजेच दि. 17 सप्टेंबर रोजी ‘बीड-अहिल्यानगर’ या टप्प्यावरील रेल्वेसेवेचा शुभारंभ करण्यात येणार आहे. या ऐतिहासिक घटनेमुळे बीड जिल्ह्यातील लाखो नागरिकांचे स्वप्न प्रत्यक्षात उतरणार आहे.




‘अहिल्यानगर-बीड-परळी वैजनाथ’ या प्रकल्पासाठी राज्य शासनाचा एकूण आर्थिक सहभाग 50 टक्के असून, आजवर शासनाने 2 हजार 91 कोटी रुपये उपलब्ध करून दिले आहेत. त्यात आता नव्याने 150 कोटींची भर घालण्यात आली आहे. या निधीचा उपयोग 2025-26 या आर्थिक वर्षात रेल्वे विभागाला राज्य सरकारचा हिस्सा देण्यासाठी केला जाणार आहे. ‘अहिल्यानगर-बीड-परळी वैजनाथ’ हा रेल्वेमार्ग 261 किलोमीटर लांबीचा असून, त्याचा एकूण खर्च 4 हजार 805 कोटी रुपये इतका आहे. त्यातील 50 टक्के म्हणजे 2 हजार 402 कोटी रुपये राज्य शासनाचा वाटा आहे. आजपर्यंत शासनाने 2 हजार 91 कोटी 23 लाख रुपये उपलब्ध करून दिले आहेत. त्यात आता आणखी 150 कोटींची भर घालण्यात आली असून या निधीचे वितरण दि. 15 सप्टेंबर 2025 रोजी करण्यात आले. मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या दोन दिवस आधी वितरीत करण्यात आलेल्या या निधीमुळे या प्रकल्पाच्या विकासाला गती येणार आहे.

बीड जिल्ह्याचे पालकमंत्रीपद स्वीकारल्यापासून उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जिल्ह्याच्या पायाभूत सुविधांच्या विकासासाठी विशेष लक्ष केंद्रित केले आहे. विमानतळ, रेल्वे व रस्ते विकासाला चालना देण्यासाठी विभागीय, जिल्हास्तरीय तसेच मंत्रालयीन पातळीवर विविध बैठका घेऊन त्यांनी संबंधित विभागांमध्ये प्रभावी समन्वय साधला आहे. या प्रयत्नांचा सकारात्मक परिणाम म्हणून ‘अहिल्यानगर-बीड-परळी वैजनाथ’ या महत्त्वाकांक्षी नवीन ब्रॉडगेज रेल्वेमार्ग प्रकल्पाला गती मिळाली आहे. मराठवाडा मुक्ती संग्राम दिनी ‘बीड-अहिल्यानगर’ या टप्प्यावरील रेल्वे धावणार असून त्याचा थेट फायदा बीड जिल्ह्यातील लाखो नागरिकांना होणार आहे.

“अहिल्यानगर-बीड-परळी वैजनाथ रेल्वेमार्ग म्हणजे बीड, अहिल्यानगर आणि परळी वैजनाथ भागातील शेतकरी, विद्यार्थी, उद्योजक, व्यापारी आणि सामान्य जनतेसाठी विकासाला नवी गती देणारा प्रकल्प आहे. या मार्गामुळे जिल्ह्यातील गुंतवणूक वाढेल, रोजगारनिर्मिती होईल आणि वाहतूक सुलभ होईल. बीड जिल्ह्याचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी हा प्रकल्प गतीमान करण्याचा माझा सातत्यपूर्ण प्रयत्न आहे. बीड जिल्ह्याचा चेहरा बदलणाऱ्या या प्रकल्पामुळे बीडकरांच्या आयुष्यात नवा विकासप्रवास सुरू होईल” असा विश्वासही उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केला आहे.

Printer, Publisher and Proprietor Shri. Vikas Patil published this daily at Somani Printing Press, Unit no. 04, Ground Floor, N. K. Industrial Estate, Aarey Road, Pravasi Industrial Estate, Gate no. 2, Goregaon East, Mumbai 400063, Maharashtra Printed at Abelia Building, 2A. Published at Horizon Flora, Bhayander Pada, Ghodbunder Road, Thane (West) 400615 Maharashtra. Phone no. +91-9967967550 Email Id mhvrutant@gmail.com RNI. No. MAHMAR/2022/86384

मुद्रक, प्रकाशक आणि मालक श्री. विकास पाटील यांनी हे दैनिक सोमानी प्रिंटिंग प्रेस, युनिट नं. ०४, तळमजला, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, आरे रोड, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेट, गेट नं. २, गोरेगाव पूर्व, मुंबई ४०००६३, महाराष्ट्र येथे छापून अबेलिया बिल्डिंग, २ ए. होरायझन फ्लोरा, भायंदर पाडा, घोडबंदर रोड, ठाणे (पश्चिम) ४००६१५ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. फोन नं. +९१-९९६७९६७५५० Email Id mhvrutant@gmail.com RNI. No. MAHMAR/2022/86384